# निर्देश पत्र
## मिरा - भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प).
ता.जि.ठाणे ४०१ १०१. दुरध्वनी क्र. : २८१९२८२८ / २८१९३०८७

( सचिव विभाग)

क्रमांक :

तारीख :

विषय मा० महासभा
दि- १२/०८/२०१६ स: ११:००वा
प्रकरण-क्र. ३६ ते ४१

प्रकरण सुरु झाल्याची तारीख :

प्रकरण बंद केल्याची तारीख :

| दिनांक | कार्यवाही |
|---|---|

३

२०१६-१७

### अभिलेखाचे वर्गीकरण

| बाब क्रमांक | वर्ग | परिक्षणाचे वर्ष | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| | (अ / ब / क / त -१ / ड) | | १ ते |

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०२/०८/२०१६.

## मा. महासभा

**मा. महासभा सूचना क्र. :- ०३, दिनांक ०२/०८/२०१६.**

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती. ------------------------------

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा शुक्रवार दि. १२/०८/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात महासभा सुचना क्र. ०३, दि. ०२/०८/२०१६ रोजी सोबतच्या विषयपत्रिकेवरील प्रकरणांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यांत येत आहे. तरी सदर सभेस उपस्थित रहावे, हि विनंती.

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

मा. महापौर सो. यांच्या मान्यतेने.

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
### मा. महासभा सुचना क्रमांक ०३, दि. ०२/०८/२०१६ सोबतची विषय पत्रिका
### सभा शुक्रवार दि. १२/०८/२०१६

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| --- | **प्रश्नोत्तरे –** |
| --- | **मागील सभांचे इतिवृत्तांत –** |
| ३६ | दि. १८/०१/२०१६, दि. ३०/०१/२०१६ (दि. १८/०१/२०१६ रोजीची तहकुब सभा) व दि. २४/०२/२०१६ रोजीच्या मा. महासभांचे इतिवृत्तांत कायम करणे. |
| --- | **सर्व निवडणुका** – निरंक |
| --- | **सर्व नियुक्त्या** - निरंक |
| --- | **मध्यप्रश्न (इंटरप्रिलेशन्स)** - निरंक |
| --- | **विनंती अर्ज** - निरंक |
| --- | **स्थायी, परिवहन व विशेष समित्यांचे ठराव** – निरंक |
| --- | **शिक्षण मंडळाची पत्रे** - निरंक |
| --- | **आयुक्तांकडील पत्रे व कामकाज –** |
| ३७ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १२ अन्वये श्री. यशवंत कांगणे, प्रभाग क्र. ३(ब) यांचे नगरसेवक पदाच्या अनर्हतेबाबतचे प्रकरण वरिष्ठ स्तर न्यायालय, ठाणे यांचेकडे पाठविण्यासाठी निर्णय घेणेबाबत. |
| ३८ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १२ अन्वये श्री. हंसुकुमार पांडे, प्रभाग क्र. ६(ब) यांचे नगरसेवक पदाच्या अनर्हतेबाबतचे प्रकरण वरिष्ठ स्तर न्यायालय, ठाणे यांचेकडे पाठविण्यासाठी निर्णय घेणेबाबत. |
| ३९ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील फेरिवाल्यांचे तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतर करणेबाबत. |
| ४० | मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागातील कार्यरत काळजीवाहक यांना मुदतवाढ देणेबाबत. |
| ४१ | राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणेबाबत. |
| ४२ | मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनिमय क्र. ५०(iii) मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेबाबत. |
| ४३ | मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरीकांसाठी मोफत WIFI Internet सुविधा देणे व Digital Surveillance सह सीसीटीव्ही यंत्रणा उभारणेबाबत. |
| ४४ | श्री. दादासाहेब खेत्रे, (निलंबित) विभागप्रमुख, अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग व श्री. दिलीप जगदाळे, (निलंबित) प्रभाग अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र.०६ निलंबन कायम करणेबाबत. |
| ४५ | अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकरीता पोलीस अधिक्षक, ठाणे ग्रामीण यांच्या आस्थापनेवरील पोलीस दलातील विविध संवर्गातील निर्माण केलेल्या ७० पदांना मुदतवाढ मिळणेबाबत. |
| ४६ | रस्ते, चौक, वास्तु नामकरणाबाबत. |
| ४७ | भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुग्णालयातील वैद्यकिय अधिकारी संवर्गातील पदांकरीता निवड केलेल्या उमेदवारांच्या नियुक्तीस मान्यता मिळणेबाबत. |
| ४८ | दि. १५ ऑगस्ट २०१६ रोजी परिवहन सेवेची वॉल्वो बससेवा सुरु करुन फक्त १५ ऑगस्ट २०१६ रोजी मुक्त सेवा देणेबाबत. |
| ४९ | महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ८ नियम ७ प्रमाणे महानगरपालिका क्षेत्रातील झोपडपट्ट्यांमधील मालमत्तांवर, मालमत्ता कराच्या आकारणीसाठी करयोग्य मुल्य ठरविणेकरिता वाजवी भाड्याचा दर निश्चित करणेबाबत. |
| -- | **शासनाकडील किंवा शासकीय अधिकाऱ्यांकडील पत्रे –** |
| --- | **समित्यांचे किंवा उप समित्यांचे अहवाल** – निरंक |

महानगरपालिका सचिव कार्यालय,
मिरा भाईंदर महानगरपालिका
दिनांक :- ०२ ऑगस्ट २०१६

(हरेश ल. पाटील)
नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

E/Backup- 2/D/MD/Nagarsachiv/Vishaypatrika/Vishaypatrika-Mahasabha 12-17

# मिरा भाईंदर महानगरपालिका

**मिरा भाईंदर महानगरपालिकेचीमा. महासभा दि.१२/०८/२०१६ रोजी आयोजितकेली आहे.**
**सदर सभेकरिता मा. सदस्यांचेखालीलप्रमाणे प्रश्न आलेले आहेत.**

| प्रश्न |
|---|
| **३७ श्रीम. दिप्ती शेखर भट्ट मा. सदस्या यांनी दि. १०/११/२०१४ रोजी विचारलेला प्रश्न** |
| मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मिरारोड (पूर्व) शांतीनगर येथील आर.जी. च्या जागांबाबत खालील प्रश्न चर्चेसाठी सादर करण्यांत येत आहेत. |
| १) आर.जी.च्या कोणकोणत्या जागा महापालिकेतील संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने हस्तांतरीत झालेल्या आहेत? जर असेल तर त्या कोणत्या? कोणत्या आर.जी. जागेवर महापालिकेमार्फत काम सुरु करण्यात आलेले आहे. |
| अ) आर.जी. मध्ये फेरबदल करण्यांत येऊ शकतो का? तसेच या अनुषंगाने पत्र क्र.मनपा/नर/३१४९/२००७-०८,दि.१२/१२/२००७ व पत्र क्र. एस.एस.बी.-२००७/३१३, दि. १८/१२/२००७ या पत्रांचा खुलासा देण्यात यावा. |
| ब) फेरबदल करण्यांत आला असेल तर तो कोणत्या नियमाने करण्यांत आला? |
| क) विकासकर्तांने मंजुर नकाशाचे उल्लंघन केले असेल तर अशा विकासकर्तावर आपण कोणती कार्यवाही करतो? |
| ड) मिरा भाईंदर महानगरपालिका आरक्षित जागेच्या मंजूर नकाशाच्या अटीशर्तीचे उल्लंघन केल्याचे दिसून आल्यावर त्याच्यावर गुन्हा दाखल केलेला असताना आपण त्याच्या दुसऱ्या प्लॅनला मंजूरी देऊ शकतो का? |
| इ) आर.जी. आरक्षित जागेवर प्लॅन व्यतिरिक्त काम मंजूर करु शकतो का? मंजूर केल्यास कोणत्या अधिनियमाने करु शकतो? ह्याचा खुलासा करावा. |
| ई) मी दिलेल्या दि. १०/०५/२०१३ च्या पत्रान्वये मिरारोड (पूर्व) मधील कोणत्या आरक्षित आर.जी. जागा व मोकळी जागा (ओपन स्पेस) कोठे कोठे वापरण्यात आलेल्या आहेत त्याचा सविस्तर खुलासा करावा. |
| **३८ श्री. जुबेर इनामदार मा. सदस्य यांनी दि. १०/११/२०१४ रोजी विचारलेला प्रश्न** |
| १) मिरा भाईंदर महानगरपालिका मा. स्थायी समिती सभा दि. २१/०८/२०१४ प्रकरण क्र. ७४, ठराव क्र. ७१ अन्वये महानगरपालिका अधिकारी व प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांच्या कामकाजाबाबत विचारविनीमय करुन निर्णय घेणे या बहुमताने मंजूर झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने महापालिकेने सदर विषयाबाबत काय कारवाई केलेली आहे? |

OK

प्रकरण क्र. ३० कारित।

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय भाईंदर (प.)

जा.क्र मनपा/आयुक्त/ ५३/२०१६-१७ दिनांक :- १०/०६/२०१६.

**मिरा भाईंदर महानगरपालिकामधील प्रभाग क्र. ३ब चे पालिका सदस्य श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांच्या अनर्हते संदर्भातील निर्णय.**

**वाचले :-**

**१) श्री. प्रेम रामअधार यादव यांचेकडील दि. १८/१०/२०१४ रोजीचा तक्रार अर्ज.**
**२) प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ०३ यांचेकडील जा.क्र.मनपा/प्र.का.३/भा.पू/ १८६७/२०१४-१५, दि.११/११/२०१४ रोजीचे पत्र.**
**३) श्री. यशवंत ठगाजी कांगणे यांचेकडील दि. २५/१२/२०१५ रोजीचे पत्र व सोबतची कागदपत्र.**

**प्रस्तावना :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०१२ च्या सार्वत्रिक निवडणुकीद्वारे श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांची प्रभाग क्र. ३(ब) मधुन नगरसेवक म्हणुन नेमणूक झालेली आहे. महानगरपालिका प्रभाग क्र. ०३ (ब) चे नगरसेवक श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांनी १) प्रभाग क्र. ३ मौजे खारी GL + ३ मजल्याचे (23.80m X 13.70m) अनधिकृत बांधकाम २) प्रभाग क्र. ३ मौजे खारी तळमजल्यावरील शॉप नं. ७,८,९ च्या समोरील पत्राशेडचे अनधिकृत बांधकाम व ३) प्रभाग क्र. ३ मौजे खारी तळमजल्यावरील शॉप ५ च्या समोरील पत्राशेडचे विना परवानगी अनधिकृत बांधकाम केल्याचे श्री. प्रेम रामअधार यादव, रा. १०६/मयुर महल, काशीनगर, भाईंदर (पू.) यांनी संदर्भित पत्र ०१ अन्वये कळवून श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांचे नगरसेवक पद रद्द करणेची मागणी केली आहे.

तक्रारदार श्री. प्रेम रामअधार यादव व नगरसेवक श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांचे म्हणणे ऐकुन घेण्यासाठी दि. २४/११/२०१५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. यावेळी तक्रारदार श्री. प्रेम रामअधार यादव सुनावणीस उपस्थित होते व त्यांनी आपले तोंडी म्हणणे मांडले आहे. नगरसेवक श्री. यशवंत ठकाजी कांगणे सुनावणीस उपस्थित नव्हते. तथापी, दि. २५/१२/२०१५ रोजी श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांनी त्यांचे लेखी म्हणणे कागदपत्रांसह सादर केले आहे.

जा.क्र मनपा/आयुक्त/ दिनांक /२०१६.

तक्रारदार श्री. प्रेम रामअधार यादव यांनी त्यांच्या तक्रारीत व झालेल्या सुनावणीत म्हणणे मांडले की, शॉप नं. ७,८,९ जैसलपार्क, एफ-१, को.ऑ.हौ.सो.लि. व शॉप नं. ५ एफ-५, को.ऑ.हौ.सो.लि. ही नगरसेवक श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांची वैयक्तिक जागा आहे. त्या जागेवर महानगरपालिकेमार्फत कलम २६० ची नोटीस देण्यात आली होती. श्री. दिलीप जगदाळे, प्रभाग अधिकारी यांनी दि. ११/१०/२०१३ रोजी सुनावणी घेऊन सदरची जागा अनधिकृत घोषित केली होती. त्या ठिकाणची पत्राशेड त्यांनी काढलेले आहे. परंतु त्याच्या पुढे असलेली भिंत त्यांनी काढलेली नाही. तसेच मेहंदी बारचे जे बांधकाम केलेले आहे ते अनधिकृत आहे व त्यामध्ये नगरसेवक श्री. यशवंत कांगणे यांचा समावेश आहे. त्यामुळे त्यांचेवर नियमानुसार कारवाई करण्यात यावी व श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांचे नगरसेवक पद रद्द करणेची मागणी केली व तक्रारीसोबत त्यांनी खालीलप्रमाणे कागदपत्र सादर केलेली आहेत.

१) पदनिर्देशित अधिकारी तथा प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ०३ यांनी मौजे खारी, मेहंदी बार ॲन्ड लॉजिंग ह्या जागेतील अनधिकृत, विना परवानगी बांधकामाबाबत श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांना कागदपत्र सादर करण्यासाठी दि. २३/०८/२०१३ रोजी बजावलेली नोटीस.

२) पदनिर्देशित अधिकारी तथा प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ०३ यांनी जैसलपार्क, एफ-१, को.ऑ.हौ.सो.लि., शॉप नं. ७,८,९ ह्या जागेतील अनधिकृत, विना परवानगी पत्राशेडच्या बांधकामाबाबत श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांना कागदपत्र सादर करण्यासाठी दि. २६/०८/२०१३ रोजी बजावलेली नोटीस.

३) पदनिर्देशित अधिकारी तथा प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ०३ यांनी जैसलपार्क, एफ-१, को.ऑ.हौ.सो.लि., शॉप नं. ५ ह्या जागेतील अनधिकृत, विना परवानगी पत्राशेडच्या बांधकामाबाबत श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांना कागदपत्र सादर करण्यासाठी दि. २६/०८/२०१३ रोजी बजावलेली नोटीस.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१


जा.क्र मनपा/आयुक्त/ दिनांक :- / /२०१६.

नगरसेवक श्री. यशवंत ठकाजी कांगणे ह्यांनी त्यांच्या लेखी उत्तरात खालीलप्रमाणे म्हणणे मांडलेले आहे की, १) प्रभाग क्र. ३ मौजे खारी GL + ३ मजल्याचे (23.80m X 13.70m) हे बांधकाम मी दि. २३/११/२०११ रोजी खरेदी खताच्या रुपाने विकत घेतलेले असून महानगरपालिकेत कर रुपाने त्याचा नियमित भरणा करीत आहे. २) प्रभाग क्र. ३ मौजे खारी तळ मजल्यावरील शॉप नं. ५,७,८,९ च्या समोरील पत्राशेड सन १९९८ रोजी टाकण्यात आलेले असून सदर शॉपची खरेदी करण्यापूर्वीच सदर पत्राशेड टाकण्यात आलेला आहे.

सदर लेखी उत्तरासोबत श्री. यशवंत ठकाजी कांगणे खालीलप्रमाणे कागदपत्र सादर केलेली आहेत.

१) तत्कालिन मिरा भाईंदर नगरपालिका परिषद यांचेकडील जा.क्र.२९८/९०-९१, दि. १९/६/१९९० अन्वये दोशी इंटस्ट्रिज इस्टेट मध्ये युनायटेड रबर इंडस्ट्रिज इस्टेट यांना अर्धवट बांधकाम पूर्ण करणेस दिलेली परवानगी.

२) दोशी इंड. इस्टेट, गाळा क्र. A/१,२,३ व A/२० बाबत मे. युनायटेड रबर इंड. व श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांचेमधील दि. ०८ सप्टेंबर २००३ रोजीचे करारपत्र (खरेदीखत)

३) दोशी इंड. इस्टेट, क्र. A/१,२,३ बाबत वसुंधरा कंन्स्ट्र. कं. व मे. युनायटेड रबर इंड. यांचेमधील दि. १९ एप्रिल १९७७ रोजीचे करारपत्र (खरेदीखत)

४) दोशी इंड. इस्टेट, A/२० बाबत वसुंधरा कंन्स्ट्र. कं. व मे. युनायटेड रबर इंड. यांचेमधील दि. २७ फेब्रुवारी १९७६ रोजीचे करारपत्र (खरेदीखत)

५) कर निर्धारक व संकलक, मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडील श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांचे नावे गाळा क्र. ०१, दोशी इंड. इस्टेट, भाईंदर (पूर्व) करिता जा. क्र. मनपा/कर/सर्व्हे/८५८/२००७-०९, दि. ०९/०८/२००७ अन्वये बजावण्यात आलेली मिळकत कर आकारणीची नोटीस.

६) प्रभाग अधिकारी, प्रभाग कार्यालय (पर्व), मिरा भाईंदर महानगरपालिका यांचेकडील श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांचे नावे मेहंदी रेस्टॉरंट ॲण्ड बार रेस्टो. लॉज करिता

जा. क्र. मनपा/प्र.का./भा.पु./३६५१/०७-०८, दि.२२/०२/२००८ अन्वये दिलेले कर आकारणी संबंधीचे पत्र.

७) उप-आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका, यांचेकडील श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांचे नावे मे. मेहंदी रेस्टॉरंट ॲण्ड बार, गाळा क्र. ०१, ओमसाई बिल्डींग, जोशी इंड. इस्टेट, भाईंदर (पूर्व) करिता जा. क्र. मनपा/आ.प./१५९/२००८-०९, दि. १९/०७/२००८ अन्वये दिलेला परवाना.

८) मिरा भाईंदर महानगरपालिका, परवाना विभाग यांचेकडील श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांचे नावे मे. ओमसाई गेस्ट हाऊस, १ ते ३ मजला, ओमसाई बिल्डींग, जोशी इंड. इस्टेट , भाईंदर (पूर्व) करिता जा. क्र. मनपा/आ.प./१६०/२००८-०९, दि. १९/०७/२००८ अन्वये दिलेला परवाना.

९) उप-आयुक्त, आरोग्य विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, यांचेकडील श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांचे नावे मे. मेहंदी रेस्टॉरंट ॲण्ड बार, गाळा क्र. ०१, ओमसाई बिल्डींग, जोशी इंड. इस्टेट, भाईंदर (पूर्व) करिता जा. क्र. मनपा/आ.प./३०५/२००९-१०, दि. ०७/०१/२०१० अन्वये दिलेला नुतणीकरण परवाना.

१०) श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांनी दि. १८/०१/२००८ रोजी मा. उपविभागीय दंडाधिकारी, ठाणे यांना ओमसाई गेस्ट लॉजिंग बोर्डींग संदर्भात लिहीलेले पत्र.

११) उप विभागीय पोलिस अधिकारी, मिरारोड विभाग यांनी दि. १५/०७/२००६ रोजी मा. उपविभागीय दंडाधिकारी, ठाणे यांना ओमसाई गेस्ट हाऊस या नावाने नवीन लॉजींग बोर्डींग परवाना मिळणेकरीता दिलेला अहवाल.

१२) दोशी इंड. प्रिमायसेस कॉ.ऑ.सोसा. लि., यांचेकडील गाळा क्र. A/१,२,३ व A/२० बाबत श्री. यशवंत ठकाजी कांगणे यांचे नावे दि. ०१/०७/२०१५ रोजीची मेंन्टनंन्स पावती.

१३) इमारतीचे फोटो.

१४) शॉप नं. ७,८,९ जैसलपार्क, एफ-१, को.ऑ.हौ.सो.लि. बाबत दि. ३१ डिसेंबर २०११ रोजींचे एकुण तीन करारपत्र (खरेदीखत)

श्री. प्रेम रामअधार यादव यांनी तक्रारीत नमुद केलेल्या विषयांकित बांधकामाबाबत संबंधीत प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ०३ यांचेकडे विचारणा केली असता, त्यांनी जा.क्र. मनपा/प्र.का.३/भा.पू./१८६७/२०१४-१५, दि. ११/११/२०१४ रोजीच्या पत्रान्वये प्रभाग कार्यालय क्र. ३ अंतर्गत येणाऱ्या नवघर रोड येथील मेहंदी बार ॲन्ड लॉजिंगच्या बांधकामाबाबत दि. १६/०९/२०१३ रोजी प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ०३ यांनी सुनावणी घेवून दि. ११/१०/२०१३ रोजी सदरचे बांधकाम १५ दिवसात पाडण्याचे आदेश देण्यात आले. परंतु दि. २१/१०/२०१३ रोजी मुळ विकासकाने सदरच्या बांधकामाबाबत ग्रामपंचायतीची परवानगीची कागदपत्रे, नगरपालिकेची परवानगी, करारपत्राची छायांकित प्रत व पूर्वीचे फोटो सादर केले आहेत.

तसेच जैसलपार्क, एफ-१, को.ऑ.हौ.सो.लि., शॉप नं. ५,७,८व ९ येथील पत्राशेडच्या बांधकामाबाबत दि. १६/०९/२०१३ रोजी प्रभाग अधिकारी, प्रभाग समिती क्र. ०३ यांनी सुनावणी घेवून दि. ११/१०/२०१३ रोजी सदरचे बांधकाम १५ दिवसात पाडण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने विकासकाने स्वतःहून बांधकाम काढून घेतल्याचे कळविले आहे.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १० चे (१ड) ची तरतुद खालीलप्रमाणे :-**

"जर पालिका सदस्याने, स्वतः त्याच्या बायकोने/तिच्या नवऱ्याने किंवा त्याच्या अवलंबिताने या अधिनियमाच्या किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा.३७) याच्या किंवा उक्त अधिनियमांखाली करण्यात आलेल्या नियमांच्या किंवा उपविधींच्या तरतुदींचा भंग करुन, कोणतेही बेकायदेशीर किंवा अनधिकृत संरचनात्मक बांधकाम केले असेल किंवा करीत असेल; किंवा असे बेकायदेशीर किंवा अनधिकृत बांधकाम करण्यास प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जबाबदार असेल किंवा पालिका सदस्य या नात्याने मदत केलेली असेल किंवा कोणतेही बेकायदेशीर

जा.क्र मनपा/आयुक्त/ दिनांक :- / /२०१६.

किंवा अनधिकृत बांधकाम पाडून टाकत असताना त्याचे शासकीय कर्तव्य पार पाडण्यात कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्यास लेखी पत्र देवून किंवा प्रत्यक्ष जागेवर जाऊन अडथळा आणला असेल किंवा अडथळा आणण्याचा प्रयत्न केला असेल तर, असा पालिका सदस्य, म्हणून राहण्यास अनर्ह ठरेल, अशी अनर्हता, उक्त अधिनियमाच्या तरतुदी अन्वये, संबंधित प्राधिकाऱ्याने, अशी संरचना बेकायदेशीर, किंवा अनधिकृत असल्याचे घोषीत केल्याच्या दिनांकापासून किंवा यथास्थिती, सक्षम प्राधिकाऱ्याविरुध्द पालिका सदस्याने हस्तक्षेप किंवा अडथळा केल्याच्या दिनांकापासून पालिका सदस्य म्हणून त्याचा पदावधी शिल्लक असेपर्यंत असेल." अशी तरतुद आहे.

तक्रारदार श्री. प्रेम रामअधार यादव यांनी पुरविलेल्या कागदपत्रांमधील दि. २३/०८/२०११ व दि. २६/०८/२०११ रोजीच्या नोटीस नुसार मौजे खारी, मेहंदी बार ॲन्ड लॉजिंग GL + ३ मजल्याचे (23.80m X 13.70m) बांधकाम व जैसलपार्क, एफ-१, को.ऑ.हौ.सो.लि., शॉप नं. ५,७,८,९ तळमजल्यावरील पत्राशेडचे बांधकामाबाबत श्री. यशवंत ठगाजी कांगणे यांना नोटीस दिल्याचे दिसुन येत आहे. मौजे खारी, मेहंदी बार ॲन्ड लॉजिंग GL + ३ मजल्याचे (23.80m X 13.70m) बांधकामाबाबत श्री. यशवंत ठगाजी कांगणे यांनी मुळ विकासकाने घेतलेल्या ग्रामपंचायत परवानगीची कागदपत्रे, करारपत्राची छायांकित प्रत, व्यवसाय करणेसाठी महानगरपलिकेने दिलेला परवाना, मिळकत कर आकारणी नोटीस व पूर्वीचे फोटो व इतर कागदपत्र आमचेकडे सादर केली आहेत.

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रारीमध्ये मौजे खारी, मेहंदी बार ॲन्ड लॉजिंग GL + ३ मजल्याचे (23.80m X 13.70m) बांधकाम व जैसलपार्क, एफ-१, को.ऑ.हौ.सो.लि., शॉप नं. ५,७,८व ९ येथील पत्राशेडचे बांधकाम कोणत्या कालावधीत करण्यात आलेले आहेत तसेच सदरचे बांधकाम अनधिकृत घोषित करण्यात आल्याबाबत कोणतेही लेखी म्हणणे/पुरावा सादर केलेले नाही. दि. २४/११/२०१५ रोजीच्या सुनावणीवेळी तक्रारदार श्री. प्रेम रामअधार यादव यांनी विषयांकित पत्राशेड श्री. यशवंत कांगणे यांनी काढलेले आहे. परंतु त्याच्या पुढे असलेली भिंत श्री. यशवंत कांगणे यांनी काढलेली नाही असे म्हणणे मांडलेले आहे. परंतु याबाबत कोणताही सबळ पुरावा तक्रारदार यांनी सादर

केलेला नाही. त्यामुळे मौजे खारी, मेहंदी बार अँन्ड लॉजिंग GL + ३ मजल्याचे (23.80m X 13.70m) बांधकाम व जैसलपार्क, एफ-१, को.ऑ.हौ.सो.लि., शॉप नं. ५,७,८,९ तळमजल्यावरील पत्राशेडचे व भिंतीचे बांधकाम कोणत्या कालावधीत करण्यात आले आहे याचा स्पष्ट बोध होत नाही.

श्री. यशवंत ठगाजी कांगणे यांनी जैसलपार्क, एफ-१, को.ऑ.हौ.सो.लि., शॉप नं. ७,८,९ बाबत दि. ३१ डिसेंबर २०११ रोजीचे करारपत्र (खरेदीखत) सादर केलेली आहेत.

श्री. यशवंत ठगाजी कांगणे हे प्रथमच दि. २८/०८/२०१२ ते मुदत संपेपर्यंत (प्रभाग क्र. ३ ब) मधुन नगरसेवक म्हणुन निवडून आलेले आहेत. तरी सदर बाबीवरुन मौजे खारी, मेहंदी बार अॅन्ड लॉजिंग GL + ३ मजल्याचे (23.80m X 13.70m) बांधकाम व जैसलपार्क, एफ-१, को.ऑ.हौ.सो.लि., शॉप नं. ५,७,८व ९ येथील पत्राशेडचे बांधकाम श्री. यशवंत ठगाजी कांगणे यांनी नगरसेवक पदी असताना केले आहे, हे स्पष्ट होत नाही. तसेच तक्रारदार श्री. प्रेम रामअधार यादव यांनी मौजे खारी, मेहंदी बार अॅन्ड लॉजिंग GL + ३ मजल्याचे (23.80m X 13.70m) बांधकाम व जैसल पार्क येथील शॉप नं. ५,७,८व ९ येथील पत्राशेडचे व भिंतीचे बांधकाम श्री. यशवंत ठगाजी कांगणे यांनी नगरसेवक पदी असताना केल्याबाबतचा पुरावा सादर केलेला नाही. त्यामुळे श्री. यशवंत ठगाजी कांगणे यांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या सदरचे बांधकाम नगरसेवक पदी असतांना केलेले आहे किंवा कसे अशी शंका निर्माण होत आहे.

तरी वरील सर्व बाबीनुसार श्री. यशवंत ठगाजी कांगणे यांनी नगरसेवक पदी असतांना (सन २०१२ ते मुदत संपेपर्यंत) मौजे खारी, मेहंदी बार अॅन्ड लॉजिंग GL + ३ मजल्याचे (23.80m X 13.70m) बांधकाम व जैसलपार्क, एफ-१, को.ऑ.हौ.सो.लि., शॉप नं. ५,७,८व ९ येथील पत्राशेडचे व भिंतीचे बांधकाम केले आहे किंवा कसे या विषयी वाद निर्माण झालेला आहे तसेच श्री. यशवंत ठगाजी कांगणे यांनी देखील विषयांकित बांधकाम केल्याचे नाकारले आहे.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

जा.क्र मनपा/आयुक्त/ दिनांक- / /२०१६.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १२ खालील प्रमाणे आहेत.**

"अनर्हतेसंबधीच्या प्रश्नांचा निर्णय न्यायाधिशाने करणे.

**१) एखाद्या पालिका सदस्याचे कलम ११ अन्वये पालिका सदस्य म्हणून पद धारक करण्याचे अधिकार बंद झाले आहे किंवा काय याविषयीची कोणतीही शंका किंवा वाद उद्‌भवल्यास अशा पालिका सदस्यास किंवा कोणत्याही अन्य पालिका सदस्यास तो प्रश्न न्यायाधीशाकडे पाठविता येईल आणि महानगरपालिकेने विनंती केल्यास, आयुक्ताने तो प्रश्न न्यायाधीशाकडे पाठविला पाहिजे.**

सदर कलमान्वये पालिका सदस्याच्या पद धारणाबाबत कोणताही आवश्यक असा वाद निर्माण झाल्यास, सदर पालिका सदस्याला किंवा पालिका सदस्यास प्रश्न न्यायाधिशाकडे पाठविता येईल अशी तरतूद आहे. परंतु तक्रारदार श्री. प्रेमअधार यादव महानगरपालिकेचे पालिका सदस्य नाहीत तसेच सदर अनर्हता संबंधीत महानगरपालिका विषयी केल्यास आयुक्तांना तो प्रश्न न्यायाधिशाकडे पाठविला पाहिजे अशी तरतूद आहे.

जनहित याचिका क्र. ९२१३/२०१३ श्री. प्रकाश काळु गायकवाड विरुध्द श्री. सचिन दत्तात्रय पोटे यांमधील मा. उच्च न्यायालयाच्या दि. ०९/०३/२०१५ रोजीच्या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०(१ड) अन्वये पालिका सदस्य म्हणून पदधारक करण्याचे अधिकार बंद केल्याबाबतचे निर्णय घेण्यास, महानगरपालिका आयुक्त प्रतिवादी क्र. १ महानगरपालिका सदस्य म्हणून पदधारणा करण्याचे अधिकार बंद करण्याबाबतच्या मतास आल्यास त्याबाबतचा औपचारीक निर्णय पारित करण्यास तसेच याबाबतीत जर निर्णय घेत असतांना पालिका सदस्याच्या पदधारणाबाबत कोणतीही शंका किंवा वाद निर्माण झाल्यास आयुक्तांनी सदरचा प्रश्न न्यायाधीशाकडे पाठविण्याबाबत निर्णय घेण्यास आदेशीत केले आहेत.

तरी प्रस्तुत प्रकरणी कायद्यातील उक्त तरतूदींचा सखोल अभ्यास करता व वरील बाबींचा विचार करता श्री. यशवंत ठगाजी कांगणे नगरसेवक यांनी विषयांकित पत्राशेडचे बांधकाम

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

जा.क्र मनपा/आयुक्त/ दिनांक :- / /२०१६.

नगरसेवक पदी असतांना केले आहे किंवा कसे या बाबत शंका किंवा वाद निर्माण झाला असल्याने सदर अधिकाराचा वापर करुन मी अच्युत हांगे, आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका, खालील प्रमाणे आदेश निर्गमित करत आहे.

**// आदेश //**

श्री. यशवंत ठकाजी कांगणे, प्रभाग क्र. ३(ब) यांचे महापालिका सदस्य म्हणून पद धारक करण्याचे अधिकार बंद झाल्याबाबतचे प्रकरणात निर्णय घेणेचा अधिकार मा. न्यायालयास असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १२ अन्वये सदर अनर्हतेबाबतचे प्रकरण वरिष्ठ स्तर दिवाणी, न्यायालय, ठाणे यांचेकडे पाठविण्यासाठीचा निर्णय घेणेकरीता प्रकरण मा. महासभेकडे सादर करणेत यावे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रती,
१) श्री. प्रेम रामअधार यादव
रा. १०६/मयुर महल,
काशीनगर, भाईंदर (पू.)

२) श्री. यशवंत ठकाजी कांगणे
अे/८, जेसल महल बिल्डींग,
जेसलपार्क, भाईंदर (पू.), ४०११०५

प्रत :-
कारवाईस्तव सचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,

छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

प्रकरण क्र. ३ करिता

जा.क्र. मंनपा/आयुक्त/७३ /२०१६-१७ दिनांक :२५/०५/२०१६.

**मिरा भाईंदर महानगरपालिकामधील प्रभाग क्र. ०६ (ब) चे पालिका सदस्य श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे यांच्या अनर्हते संदर्भातील निर्णय.**

**वाचले :-** १) श्री. राजु विश्वकर्मा यांचा दि. २०/४/२०१५, दि. १७/१२/२०१५ व दि. ०१/०२/२०१६ रोजीचा तक्रार अर्ज.

२) नगरसेवक श्री. हंसुकुमार पांडे यांचे दि. १७/१२/२०१५ रोजीचे उत्तर. (प्राप्त दि. ५/०१/२०१६)

**प्रस्तावना :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या सन २०१२ च्या सार्वत्रिक निवडणुकीद्वारे श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांची प्रभाग क्र. ६ ब मधून नगरसेवक म्हणून निवड झाली आहे. तक्रारदार श्री. राजु जी. विश्वकर्मा यांचे संदर्भीय पत्र क्रमांक १ अन्वये नगरसेवक श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांनी पालिका सदस्य असतांना जेसल पार्क गृह संकुलनातील प्लॉट क्र. ७, सेक्टर ई येथील तळ + १ मजला या इमारतीत वाढीव अनधिकृत बांधकाम केले असल्यामुळे श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांचे नगरसेवक पद रद्द करण्याची मागणी केली आहे.

तक्रारदार श्री. राजु जी. विश्वकर्मा व नगरसेवक श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांचे म्हणणे ऐकुन घेण्यासाठी दि. २४-११-२०१५ व दि. ०५-०१-२०१६ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. नगरसेवक श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांना तक्रारदार श्री. राजु जी. विश्वकर्मा यांनी दाखल केलेल्या तक्रारीच्या प्रती व त्यासोबत जोडण्यात आलेल्या कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत. सदर तक्रारींच्या अनुषंगाने नगरसेवक श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांनी दि. १७-१२-२०१५ रोजीच्या (प्राप्त दि. ५/१/२०१६) पत्रान्वये त्यांचे लेखी उत्तर दाखल केले आहे.

तक्रारदार श्री. राजु जी. विश्वकर्मा यांनी त्यांच्या तक्रारीत व झालेल्या सुनावणीत म्हणणे मांडले की, श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांनी जेसल पार्क गृह संकुलनातील प्लॉट क्र. ७, सेक्टर ई येथील तळ + १ मजला या इमारतीमध्ये नगरसेवक पदी असतांना वाढीव अनधिकृत बांधकाम केले आहे. सदर बांधकामास महानगरपालिकेने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम अंतर्गत नोटीसा बजाविण्यात आल्या होत्या आणि त्याबाबतीत महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

जा.क्र मनपा/आयुक्त/४३ /२०१६-१७ दिनांक :- २५/०५/२०१६.

विरुध्द श्री. हंसुकुमार पांडे यांनी दावा स्पेशल सिव्हील सुट ५८३/२००२ दाखल केला होता. सद्यस्थितीत विषयांकित इमारतीत मंजुर नकाशा व्यतिरिक्त वाढीव बांधकाम केल्यामुळे श्री. हंसुकुमार पांडे यांना देण्यात आलेला भोगवटा दाखला देखील रद्द करण्यात आलेला आहे. तरी श्री. हंसुकुमार पांडे यांनी नगरसेवक पदी असताना जेसल पार्क गृह संकुलनातील प्लॉट क्र. ७, सेक्टर ई येथील तळ + १ मजला या इमारतीत वाढीव अनधिकृत बांधकाम केल्यामुळे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १० चे पोटकलम (१ ड) नुसार श्री. हंसुकुमार पांडे यांचे नगरसेवक पद रद्द करणेस मागणी केली आहे. सदर तक्रारीसोबत त्यांनी खालील प्रमाणे कागदपत्र सादर केलेले आहेत.

१. विधी विभागाचे जा.क्र.मनपा/विधी/७५७/२०१४-१५ दि. १८/२/२०१५ रोजीचे पत्र व जा.क्र./मनपा/विधी/ २१२६/२००९-१० दि. २१-१२-२००९ रोजीचे पत्र.
२. मनपा अभियोक्ता श्री. अशोक कुलकर्णी यांचे दि. ३०-११-२००५ रोजीचे पत्र.
३. विषयांकित जागा मौजे खारी सर्वे क्र.१५९ ते १६४ (नविन २० ते २५ ) या जागेवर तळ + १ मजला ऐवजी दुसऱ्या मजल्याचे वाढीव बांधकाम केल्याबाबत श्री. हंसुकुमार कमलकुमार पांडे यांना जा.क्र.मिभा.मनपा/अवि./५४/४६८/२००२-०३ दि. १२-०४-२००२ रोजी मुंबई प्रांतीक अधिनियमचे कलम २६०(१) (२) अन्वये व जा.क्र.मिभा/मनपा/अवि.५३/४६७/ २००२-०३, दि. १२-०४-२००२ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५४ अन्वये देण्यात आलेल्या नोटीसा.
४. दावा क्र. स्पेशल सिव्हील सुट ५८३/२००२ ची प्रत, सदर दाव्यात महानगरपालिकेने दाखल केलेले लेखी कथन व आदेशाची प्रत.
५. विषयांकित इमारतीस दि. १५-०६-२००७ रोजी जा.क्र.मनपा/नर/९४७/२००७-०८ अन्वये देण्यात आलेला भोगवटा दाखला रद्द केल्याचा आदेश दि. ०७-१०-२०१५ जा.क्र.मिभा/मनपा/नर/२७५९/ २०१५-१६ व नगररचना विभागाचा अहवाल दि. ०६-१०-२०१५.
६. रिट याचिका क्र. ९२१३/२०१३ श्री. प्रकाश काळु गायकवाड विरुध्द श्री. सचिन दत्तात्रय पोटे मधील मा. उच्च न्यायालयाच्या दि. ०९-०३-२०१५ रोजी निर्णयाची प्रत व रिट याचिका

क्र. १००१६/२०१५ श्री. सचिन पोटे विरुध्द कल्याण डोंबिवली महानगरपालिका मधील मा. उच्च न्यायालयाच्या दि. १६-१०-२०१५ रोजी निर्णयाची प्रत.

७. ठाणे महानगरपालिकाचे आयुक्त श्री. संजय जैसवाल यांनी श्री. मनोहर रामा साळवी, नगरसेवक यांचे विरुध्द केलेल्या कार्यवाहीचे कागदपत्र.

नगरसेवक श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांनी त्यांच्या लेखी उत्तरात खालील प्रमाणे म्हणणे मांडलेले आहे की, ते विषयांकित इमारतीत (बंगल्यात) सन २००१ पासुन अद्याप पर्यंत वास्तव्यास असुन सन २००२ मध्ये प्रथमतः नगरसेवक म्हणून निवडून आले आहेत. तसेच सदरच्या बंगल्यात राहण्यास आल्यापासुन त्यांनी कोणतेही बांधकाम केलेले नसुन सदरची तक्रार आधारशुन्य आहे. तक्रारदार यांनी सदरची तक्रार मात्र त्याचा वैयक्तीक हेतु साध्य करण्यासाठी केलेली असून श्री. राजू विश्वकर्मा यांची तक्रार खोटी असल्याने ती धुडकावून लावण्यात यावी. जेणेकरुन तक्रारीच्या जोरावर समर्पित लोकसेवकांना नाहक त्रास देणाऱ्या अशा तक्रारदारांवर शासनाचा वचक बसेल.

सदर लेखी उत्तरासोबत श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांनी जोल्याचा दाखला जा.क्र.मनपा/नर/ ३६६/२७७०/२०००-०१ दि. ०५-०८-२००० व विषयांकित इमारतीचा विद्युत देयक दि. ०८-०८-२००२ अशी कागदपत्रं जोडलेले आहेत.

तक्रारदार श्री. राजू विश्वकर्मा यांनी तक्रारीत नमुद केलेल्या विषयांकित इमारतीमधील वाढीव बांधकामाबाबत संबंधीत प्रभाग अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र. ४ यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी सदर इमारतीमधील वाढीव बांधकामा संदर्भात महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २६० (१)(२) अन्वये कायदेशीर कार्यवाही प्रस्तावित केल्याबाबत कळविले आहे.

तरी तक्रारदार श्री. राजु जी. विश्वकर्मा व नगरसेवक श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांचे म्हणणे ऐकून घेऊन व त्यांनी दाखल केलेले लेखी म्हणणे व कागदपत्रांची पडताळणी करुन मी खालील प्रमाणे निष्कर्षावर येत आहे.

माझ्याकडे सादर केलेल्या कागदपत्रावरुन मौजे खारी सर्व्हे नं. नविन २० ते २५, जुना १५९ ते १६४ या जागेवर (विषयांकित जागा) बांधकाम करणेस तत्कालीन नगरपालिकेने पत्र

जा.क्र मनपा/आयुक्त/४३ /२०१६-१७ दिनांक :२४/०५/२०१६.

क्र.नपा/नर/२४०१/१२८/२०००-२००१ दि. १३-४-२००० अन्वये सुधारीत बांधकाम परवानगी व नकाशा मंजुर असल्याबाबत व जा.क्र.नपा/नर/३६६/२७७०/२०००-२००१ दि. ५/८/२००० अन्वये जोत्याचा दाखला दिल्याचे दिसून येत आहे.

**महाराष्ट्र महानगर पालिका अधिनियम कलम १० चे (१ ड) ची तरतूद खालीलप्रमाणे :-**

"जर पालिका सदस्याने स्वतः त्यांच्या बायकोने/तिच्या नवऱ्याने किंवा त्याच्या अवलंबिताने या अधिनियमाच्या किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम,१९६६ (१९६६ चा महा.३६) याच्या किंवा उक्त अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांच्या किंवा उपविधीच्या तरतूदींचा भंग करुन कोणतेही बेकायदेशीर किंवा अनाधिकृत संरचनात्मक बांधकाम केले असेल किंवा करीत असेल किंवा अर बेकायदेशीर किंवा अनधिकृत बांधकाम करण्यास प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जबाबदार असेल किंव पालिका सदस्य या नात्याने मदत केलेली असेल किंवा कोणतेही बेकायदेशीर किंवा अनधिकृत बांधका पाडून टाकत असतांना त्यांचे शासकीय कर्तव्य पार पाडण्यात कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्यास लेखी प देवून किंवा प्रत्यक्ष जागेवर जाऊन अडथळा आणला असेल किंवा अडथळा आणण्याचा प्रयत्न केल असेल तर, असा पालिका सदस्य, म्हणून राहण्यास अनर्ह ठरेल, अशी अनर्हता, उक्त अधिनियमाच्य तरतूदी अन्वये, संबंधित प्राधिकाऱ्याने, अशी संरचना बेकायदेशीर, किंवा अनधिकृत असल्याचे घोषि केल्याच्या दिनांकापासून किंवा यथास्थिती, सक्षम प्राधिका-याविरुध्द पालिका सदस्याने हस्तक्षेप, किंव अडथळा केल्याच्या दिनांकापासून पालिका सदस्य म्हणून त्याच्या पदावधी शिल्लक असेपर्यंत असेल" अशी तरतूद आहे. सदर कलमान्वये पालिका सदस्याने अनधिकृत बांधकाम केले असेल किंवा करि असेल तर अशी संरचना अनधिकृत घोषित केल्याच्या दिनांकापासून पालिका सदस्य राहण्यास अनर्ह ठरेल अशी तरतूद आहे.

तक्रारदार यांनी पुरविलेल्या कागदपत्रांमधील नोटीस दि. १२-०४-२००२ नुसार विषयांकित जागेवरील बांधकामावर दुसऱ्या मजल्याचे वाढीव बांधकाम झाल्याबाबत श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांना नोटीस दिल्याचे दिसुन येत आहे. तद्नंतर दि. १५-०६-२००७ रोजी जा.क्र.मनपा/नर/४४७/२००७-०८ अन्वये भोगवटा दाखला दिल्याचे दिसुन येत आहे. परंतु दि. ०७-१०-२०१५ रोजीच्या आदेशान्वये

जा.क्रं मनपा/आयुक्त/७३ /२०१६-१७ दिनांक :२६/०५/२०१६

सदर जागेवरील इमारतीचे वाढीव बांधकाम भोगवटा दाखला प्राप्त झाल्यानंतर केले असल्यामुळे जेसल पार्क गृह संकुलनातील प्लॉट क्र. ७, सेक्टर ई येथील तळ + १ मजला स्वरुपाचा बंगल्यासाठी देण्यात आलेला भोगवटा दाखला रद्द केल्याचे दिसुन येत आहे. तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रारीमध्ये तळ + १ इमारतीमधील वाढीव बांधकाम कोणत्या कालावधीत करण्यात आलेले आहेत तसेच सदरचे बांधकाम अनधिकृत घोषित करण्यात आल्याबाबत कोणतेही लेखी म्हणणे/पुरावा सादर केलेले नाही. (जोत्याचा दाखला व विद्युत देयक) त्यामुळे विषयांकित इमारतीमधील वाढीव बांधकाम कोणत्या कालावधीत करण्यात आले आहे याचा स्पष्ट बोध होत नाही.

श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांनी त्यांच्या लेखी कथनासोबत सादर केलेले कागदपत्राद्वारे विषयांकित बांधकाम जुलै २००२ पुर्वी पासुन अस्तित्वात असल्याचे दिसुन येत आहे. तथापि श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे दि. १६ ऑगस्ट २००२ ते २७ ऑगस्ट २००७ (प्रभाग क्र.८ ब), दि. ०६-१२-२०११ ते २७-०८-२०१२ (नामनिर्देशीत सदस्य) व दि. २८-०८-२०१२ ते मुदत संपेपर्यंत (प्रभाग क्र. ६ ब) नगरसेवक म्हणून निवडून आलेले आहेत. तरी सदर बाबीवरुन विषयांकित इमारतीत वाढीव बांधकाम श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांनी नगरसेवक पदी असताना केले आहे, हे स्पष्ट होत नाही. तसेच तक्रारदार श्री. राजु विश्वकर्मा यांनी विषयांकित वाढीव बांधकाम श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांनी नगरसेवक पदी असताना केल्याबाबतचा याचा पुरावा माझ्याकडे सादर केलेला नाही त्यामुळे श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांनी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या सदरचे बांधकाम नगरसेवक पदी असतांना केलेले आहे किंवा कसे अशी शंका निर्माण होत आहे.

तरी वरील सर्व बाबीनुसार श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांनी नगरसेवक पदी असतांना (सन २००२ ते २००७, २०१२ ते मुदत संपेपर्यंत) जेसल पार्क गृह संकुलनातील प्लॉट क्र. ७/ सेक्टर ई येथील तळ + १ मजला या इमारतीत वाढीव बांधकाम केले आहे कसे या विषयी वाद निर्माण झालेला आहे तसेच श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे यांनी देखील विषयांकित जागेवर वाढीव अनधिकृत बांधकाम केल्याचे नाकारले आहे.

जा.क्र मनपा/आयुक्त/ /२०१६-१७ दिनांक / /२०१६.

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १२ खालील प्रमाणे आहेत.**

"अनर्हतेसंबधीच्या प्रश्नांचा निर्णय न्यायाधिशाने करणे.

**१) *एखाद्या पालिका सदस्याचे कलम ११ अन्वये पालिका सदस्य म्हणून पद धारक करण्याचे* अधिकार बंद झाले आहे किंवा काय याविषयीची कोणतीही शंका किंवा वाद उद्भवल्यास अशा पालिका सदस्यास किंवा कोणत्याही अन्य पालिका सदस्यास तो प्रश्न न्यायाधीशाकडे पाठविता येईल आणि महानगरपालिकेने विनंती केल्यास, आयुक्ताने तो प्रश्न न्यायाधीशाकडे पाठविला पाहिजे.**

सदर कलमान्वये पालिका सदस्याच्या पद धारणाबाबत कोणताही आवश्यक असा वाद निर्माण झाल्यास, सदर पालिका सदस्याला किंवा पालिका सदस्यास प्रश्न न्यायाधिशाकडे पाठविता येईल अशी तरतूद आहे. परंतु तक्रारदार श्री. राजु विश्वकर्मा महानगरपालिकेचे पालिका सदस्य नाहीत तसेच सदर अनर्हता संबंधीत महानगरपालिका विषयी केल्यास आयुक्तांना तो प्रश्न न्यायाधिशाकडे पाठविले पाहिजे अशी तरतूद आहे.

तसेच तक्रारदार श्री. राजु विश्वकर्मा यांनी त्यांच्या तक्रारीसोबत जनहित याचिका क्र. ९२१३/२०१३ श्री. प्रकाश काळु गायकवाड विरुध्द श्री. सचिन दत्तात्रय पोटे यांमधील मा. उच्च न्यायालयाच्या दि. ०९-०३-२०१५ रोजीच्या निर्णयाची प्रत सादर केलेली आहे. सदर निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयाने कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचे आयुक्त यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०(१ड) अन्वये पालिका सदस्य म्हणून पदधारक करण्याचे अधिकार बंद केल्याबाबतचे निर्णय घेण्यास, महानगरपालिका आयुक्त प्रतिवादी क्र. १ महानगरपालिका सदस्य म्हणून पदधारणा करण्याचे अधिकार बंद करण्याबाबतच्या मतास आल्यास त्याबाबतचा औपचारीक निर्णय पारित करण्यास तसेच याबाबतीत जर निर्णय घेत असतांना पालिका सदस्याच्या पदधारणाबाबत कोणतीही शंका किंवा वाद निर्माण झाल्यास आयुक्तांनी सदरचा प्रश्न न्यायाधीशाकडे पाठविण्याबाबत निर्णय घेण्यास आदेशीत केले आहेत.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (पश्चिम) ता.जि. ठाणे ४०१ १०१

**जा.क्र मनपा/आयुक्त/७७३ /२०१६-१७** **दिनांक :२५/०५/२०१६**

तरी प्रस्तुत प्रकरणी कायद्यातील उक्त तरतूदींचा सखोल अभ्यास करता व वरील बाबींचा विचार करता श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे नगरसेवक यांनी विषयांकित बांधकाम नगरसेवक पदी असतांना केले आहे किंवा कसे या बाबत शंका किंवा वाद निर्माण झाला असल्याने सदर अधिकाराचा वापर करुन मी अच्युत हांगे, आयुक्त मिरा भाईंदर महानगरपालिका, खालील प्रमाणे आदेश निर्गमित करत आहे.

**// आदेश //**

श्री. हंसुकुमार पांडे, प्रभाग क्र. ६(ब) यांचे महापालिका सदस्य म्हणून पद धारक करण्याचे अधिकार बंद झाल्याबाबतचे प्रकरणात निर्णय घेणेचा अधिकार मा. न्यायालयास असल्याने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम १२ अन्वये सदर अनर्हतेबाबतचे प्रकरण वरिष्ठ स्तर दिवाणी, न्यायालय, ठाणे यांचेकडे पाठविण्यासाठीचा निर्णय घेणेकरीता प्रकरण मा. महासभेकडे सादर करणेत यावे.

**(अच्युत हांगे)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रति,**

१) **तक्रारदार**
**श्री. राजु जी विश्वकर्मा**
शॉप नं.५ जय साई पुजा बिल्डींग,
कस्तुरी पार्क, नवघर रोड,
भाईंदर पुर्व, जिल्हाः- ठाणे

२) **श्री. हंसूकुमार कमलकुमार पांडे**
वरदान-७, कपुर टॉवर मागे,
जेसल पार्क भाईंदर पुर्व,
जिल्हाः- ठाणे

**प्रत :-**
कारवाईस्तव सचिव विभाग.

E.\01 Backup 02\1 D\01 My Document\01 Nagar Sachiv\11 Disqualified\Hansukumar Pande - Raju Vishwakarma\Sunavani docx

७

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

मा. महासभा
सभा दि :-१२ / ०८/२०१६

।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ३९

विषय :- मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील फेरीवाल्यांचे तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतर करणेबाबत.

संदर्भ :-१.भारताचे राजपत्र असाधारण भाग २-खंड १, सं ८ नवी दिल्ली, बुधवार मार्च ५ २०१४ पथविक्रेते (उपजिविकेचे रक्षण आणि पथ विक्रयाचे नियमन)

२. महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार - अ, असाधारण क्रमांक १७२ दि.०७/१०/२०१५

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील "दीनदयाळ अंत्योदय योजना - राष्ट्रीय नागरी उपजिविका अभियान" अंतर्गत नागरी पथविक्रेयांच्या अधिकाराचे रक्षण करणे आणि पथविक्रेत्यांच्या कृत्यांचे नियम २०१४ (फेरीवाला सर्व्हेक्षण) अंतर्गत सर्व्हेक्षण करणेकामी दि.०८/०५/२०१५ रोजी फेरनिविदा "ई-टेंडरींग" पध्दतीने काढण्यात आली होती.

सदर ई-टेंडरिंग पध्दतीने निविदा प्रक्रियेत ०६ निविदा धारकांनी निविदेत भाग घेतला.त्यापैकी ३ पात्र निविदाधारकांपैकी "मे.सार आयटी रिसोर्स प्रा.लि." यांचे दर कमी आहेत, सदर निविदाधारकांचे दर हे मनपा निविदा निवड समिती समोर वाटाघाटीकरीता ठेवले असता वाटाघाटीअंती निविदा निवड समितीने "मे.सार आयटी रिसोर्स प्रा.लि." यांच्या दरांना मान्यता दिले नंतर सदर प्रस्तावास दि.१४/०८/२०१५ रोजी मा. स्थायी समिती सभा प्रकरण क्र.५५, ठराव क्र.५६ नुसार मान्यता देण्यात आलेली आहे.

सदर फेरीवाला सर्व्हेक्षण करणेसाठी अंदाजीत रु.३० लाख खर्च अपेक्षित आहे. संदर्भिय पत्र .क्र.२ अन्वये फेरीवाल्यांच्या सर्व्हेक्षण व इतर बाबी करीता नागरी संस्थेने (शासकीय अथवा अशासकीय संस्था किंवा इतर संस्था) नियुक्त केली तर, मंजुरीचा प्रस्ताव फेरीवाल्यांना सहाय्य या घटकाच्या अंमलबजावणी करण्याबाबत क्र.रानाउअ २०१४/स्वयंरोजगार/सुचना/का-१६ दि.२२/०१/२०१५ रोजीचे पत्रान्वये राज्य अभियान संचालकांकडे सादर करण्यात यावा असे निर्देश आहेत. त्यानुसार दि.२४/०८/२०१४ या दिवशी सदरचा प्रस्ताव मा. नगरपरिषद संचालनालय वरळी येथे पाठविण्यात आलेला आहे. तसेच

सदरच्या प्रस्तावावर लवकर कार्यवाही करण्यात यावी म्हणुन अनुक्रमे दि.०७/१०/२०१५, दि.२१/११/२०१५ व दि.०३/१२/२०१५ रोजी मा. नगरपरिषद प्रशासन संचालनालय, वरळी, कार्यालयास पत्रव्यवहार केला असता तसेच मा. आयुक्त सो. आणि विभागामार्फत अनेकवेळा दुरध्वनीव्दारे संपर्क करण्यात आलेला असुनही आजतागायत कोणतेही उत्तर प्राप्त झालेले नाही.

भारताचे राजपत्र असाधारण भाग २- खंड १ सं८, नवी दिल्ली, बुधवार मार्च ५, २०१४ पथविक्रेते (उपजिविकेचे रक्षण आणि पथ-विक्रयाचे नियमन) २०१४ प्रकरण क्र.२ पथविक्रेयाचे नियमन नुसार पथविक्रेत्यांची पाहणी आणि हकालपट्टी किंवा स्थानांतरणाबाबतचे अधिकार शहर फेरीवाला समितीस आहेत.

मा. नगरसेवक श्री. नरेंद्र मेहता यांनी दि.२८/०६/२०१६ या रोजीच्या मा. महासभेसमोर लक्षवेधी मांडण्यात आली आहे. सदर लक्षवेधी मध्ये अनधिकृत फेरीवाला वर कारवाई करणे बाबत विषय घेण्यात आला आहे. सदर प्रस्तावामध्ये महानगरपालिका क्षेत्रामध्ये फेरीवाला बाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करण्यात यावी असे नमुद केले आहे. सदर लक्षवेधी च्या अन्वये दिनांक ७/७/२०१६ पासुन प्रशासनामार्फत महानगरपालिका क्षेत्रामध्ये फेरीवाल्यावर कार्यवाही सुरु असुन सदर कार्यवाहीमुळे फेरीवाल्यांचे मोठया प्रमाणात नुकसान होत आहेत. तरी तात्पुरत्या स्वरुपात फेरीवाला यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देणे योग्य वाटते.

महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार- अ दि.७ ऑक्टोबर २०१५ असाधारण क्रमांक १७२ नगरविकास विभाग The Street Vendors (Protection of livelihood And Regulation of Street Vending) Act, २०१४ मधील कलम ३८ नुसार प्रसिध्द केलेले नियंमाचे प्रारुप अंतिम मंजुरीस्तव शासनस्तरावर प्रस्तावित असुन प्रारुपास अंतिम मंजुरी मिळेपर्यंत तात्पुरत्या स्वरुपात त्यांना पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याबाबत निर्णय घेण्यास मा. महासभेकडे शिफारस आहे.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. २५/०७/१६ वेळ ०१:२० PM
~~मा. स्थायी समिती~~ / ... गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. 38
लिपीक
नगरसचिव विभाग.

c:\users\suwarna\desktop\ferivala\ghoshwara ferivalal\ferivala dhoran.docx

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

अपंग कल्याण विभाग
सभा दि :-१२/०५/२०१६

।। गोषवारा ।।

**प्रकरण क्र.४०:- मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागातील कार्यरत काळजीवाहक यांना मुदतवाढ देणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात विशेष गरजाधारक विदयार्थ्यांची काळजी घेण्यासाठी सर्व शिक्षा अभियाना अंतर्गत ०६ काळजीवाहक नेमण्यात आलेले आहेत. मा. आयुक्त सो. यांचेकडुन सदर कार्यरत खालील काळजीवाहकांना मुदतवाढ देणे व त्याचे मानधन हे समाजविकास विभाग "अंध व अपंग कल्याण योजना" अंतर्गत अदा करण्याचे तोंडी निर्देश प्राप्त झाले होते. त्यानुसार खालील ०६ काळजीवाहकांना मा. महासभा दि.४/१२/२०१५ प्रकरण क्र.११६ ठराव क्र.८७ नुसार रु.४०००/- मानधनासाठी व त्यांना पुढील १ वर्षाची (दि. १ एप्रिल २०१५ ते दि. ३१ मार्च २०१६) मुदतवाढ देण्यात आलेली होती.

| अ.क्र. | नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्रीम. मेघा सावळकर | काळजीवाहक |
| २ | श्रीम. सायली चव्हाण | काळजीवाहक |
| ३ | श्रीम. दिपा भोईर | काळजीवाहक |
| ४ | श्रीम. गुलाब दिवेकर | काळजीवाहक |
| ५ | श्रीम. सुनिता गोसावी | काळजीवाहक |
| ६ | श्रीम. राजश्री शर्मा | काळजीवाहक |

"अपंग व मतिमंद मुलांसाठी शासकीय व निमशासकीय हॉस्पिटल मधुन Therapy /शिक्षणासाठी आर्थिक मदत" या लेखाशिर्षा अंतर्गत सन २०१६-१७ च्या अर्थसंकल्पात रु.२०लाख (रु. वीस लाख मात्र) तरतुद करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने काळजीवाहक यांना १ एप्रिल २०१६ पासुन एक वर्षाची मुदतवाढ देणे व सदर लेखाशिर्षातुन एप्रिल २०१६ पासुन काळजीवाहकांचे मानधन रु.४०००/- प्रती महिना अदा करणेबाबतचा प्रस्ताव मा. महासभा समोर ठेवणेस शिफारस आहे.

(श्री. अच्युत हांगे) 6/16
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

c:\users\deputy-c\desktop\pravina\kaljivahak vetan vadh.doc

गोषवारा प्राप्त दि. २८ ८/२०१५ वेळ ११:
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. 32
लिपीक
नगरसचिव विभाग.

(९)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे, ४०१ १०१.

महासभा दि :-१२/०८/२०१६

## || गोषवारा ||

प्रकरण क्र.४९- राज्यस्तरीय, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्या खेळाडूंना आर्थिक सहाय्य करणेबाबत.
संदर्भ - शासन निर्णय क्रं. क्रीडाधो-३११३/प्र.क्र.२८/क्रीयुसे-३ दि. २८/४/२०१४

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील खेळांडूनी राज्य तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर दर्जेदार कामगिरी करुन पदत विजेते खेळाडू तयार व्हावेत यासाठी महानगरपालिकेमार्फत "महापौर चषक" सारख्या स्पर्धाचे आयोजन केले जात आहे. क्रीडा विषयक तंत्रशुध्द प्रशिक्षण, खेळांडूच्या दर्जात सुधारणा, दर्जेदार पायाभूत सुविधा, खेळांडूंचा गौरव, क्रीडा प्रशिक्षकांना अद्यावत तंत्रज्ञानाची ओळख या बाबी विचारात घेवुन संदर्भा[illegible]नुसार शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. राज्यातील खेळाडूंना अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भाग घेण्यासाठी प्रोत्साहन मिळावे तसेच अत्यत्कृष्ट कामगिरी दाखविण्यासाठी आर्थिक सहाय्य करण्याच्या सुचना सदर शासन निर्णयात देण्यात आलेल्या आहेत.

ऑलंम्पिक स्पर्धेमध्ये ज्या खेळ/क्रीडा प्रकारांचा समावेश असतो तेच खेळ/क्रीडा प्रकार खालील नमुद इतर स्पर्धामध्ये आर्थिक सहाय्य मिळण्यास अनुज्ञेय आहेत असे शासन निर्णयामध्ये नमुद आहे.

| | | |
|---|---|---|
| १)ऑलपिंक गेम्स् | ६) राष्ट्रकुल युवा स्पर्धा | ११) शालेय आशियाई/जागतिक स्पर्धा |
| २)विश्व अंजिक्यपद स्पर्धा | ७) एशियन चॅम्पियनशिप | १२) पॅरा ऑलंम्पिक स्पर्धा |
| ३)एशियन गेम्स | ८) युथ ऑलम्पिक | १३) पॅरा एशियन गेम्स |
| ४)राष्ट्रकुल स्पर्धा | ९) ज्यु. विश्व अजिंक्य पद स्पर्धा | १४) ज्युनियर एशियन चॅम्पियनशीप |
| ५)एशियन कप | १०) वर्ल्ड कप | |

वरील स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या स्पर्धकांसाठी आर्थिक सहाय्यासाठी खेळाडूंची पात्रता निश्चित करण्याचे निकष खालीलप्रमाणे,

१) संबंधित खेळाडू महाराष्ट्राचा १५ वर्षाचा रहिवासी असावा.

२) सदर खेळाडूंनी मागील तीन वर्षात कनिष्ठ/वरिष्ठ राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधीत्व करुन किमान एकदा पदक मिळविणे आवश्यक आहे.

३) भारतीय शालेय खेळ महासंघ अथवा अधिकृत भारतीय खेळ संघटना यांच्यावतीने अधिकृत आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धासाठी निवड झाल्याबाबत प्रमाणपत्र संबंधित खेळाडूकडे असावे. निमंत्रित स्वरूपाच्या स्पर्धासाठी झालेली निवड पात्र ठरणार नाही.

४) खेळाडूने राष्ट्रीय स्पर्धेत नविन विक्रम प्रस्थापित केली असेल असा अधिकृत स्पर्धेतील खेळाडू.

अधिकृत आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहाभागासाठी पात्र होणाऱ्या खेळांडूना प्रवास खर्च, प्रवेश शुल्क, निवास, भोजन इत्यादीसाठी खर्चाच्या ७५ टक्के किंवा कमाल रु.१.०० लाख यापैकी कमी असेल ते अर्थसहाय्य मिळु शकेल तसेच अर्थसहाय्य क्रीडा प्रकार (वैयक्तिक/सांघीक) व स्पर्धा आयोजनाचे ठिकाण यावर अवलंबुन असलेबाबतच्या सुचना संदर्भिय शासन निर्णयात नमुद केलेल्या आहेत.

तरी राज्य तसेच राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर सहभागी होणाऱ्या खेळांडूना सन २०१६-१७ क्रिडा विभागाच्या अंदाजपत्रकातील "खेळाडू प्रशिक्षण व प्रोत्साहन" या लेखाशिर्षातुन आर्थिक सहाय्य करणेकामी धोरणात्मक निर्णय घेणेकरीता सदरचा विषय मा महासभेसमोर ठेवण्यास शिफारस आहे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव विभाग नोंद: २०/६/१६ ... ११.५० ... नोंद रजिस्टर क्र. ... ३३ ... नगरसचिव विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा.महासभा दि. १२/०८/२०१६

**नगररचना विभाग**

## // गोषवारा //

**प्रकरण क्र (५२) – मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र. ५०(iii) मध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार फेरबदल करणेबाबत.**

मिरा भाईंदर शहराची विकास योजना (वगळलेला भाग सोडून) दि.१४/०५/१९९७ रोजी मंजूर झालेली असून दि.१५/०७/१९९७ पासून अंमलात आलेले आहे. वगळलेल्या भागाची विकास योजना दि.२५/०८/२००० रोजी मंजूर झालेली असून दि.१५/१०/२००० पासून अंमलात आलेली आहे. मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत शासन निर्णय क्र. टिपीएस-१२०८/१३४६/प्र.क्र.२६७/०८/नवि-१२, दि.२९/०८/२००९ अन्वये फेरबदल मंजूर झाले आहेत.

सदर मंजूर विकास नियंत्रण नियमावलीमधील विनियम क्र. ५०(iii) प्रमाणे रहिवास वापराच्या इमारतीमध्ये तळ किंवा पहिल्या मजल्यावर नर्सिंग होम्स; पॉलीक्लिनीक्स्, मॅटर्निटी होम्स व मेडिकल प्रॅक्टीक्शनर / कंन्सल्टंट हा वापर अनुज्ञेय केलेला असून त्यासाठी स्वतंत्र इमारत किंवा जागेसाठी स्वतंत्र जिना असणे आवश्यक आहे.

तथापि बहुतांश ठिकाणच्या विद्यामान इमारती मध्ये स्वतंत्र जिन्याचे बांधकाम करणे शक्य होत नसल्यामुळे व वाढती लोकसंख्या विचारात घेता वैद्यकिय सेवामध्ये वाढ होण्याच्या दृष्टीकोनातून नव्याने निर्माण होणा-या इमारती वगळता पुर्वीच्या विद्यमान इमारतीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने “महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७(१) अन्वये”, याबाबत फेरबदलाचा प्रस्ताव शासनास सादर केल्याप्रमाणे सदर बाबतीत विद्यमान इमारतीमध्ये स्वतंत्र जिन्याचे बांधकाम शक्य होत नसल्यास मुख्य वैद्यकिय अधिकाऱ्याशी चर्चा करुन इमारतीमधील वास्तव्यास असलेल्या लोकांना त्रास होणार नाही याची दक्षता घेऊन स्वतंत्र जिन्याबाबत सवलत देणेचे अधिकार मा. आयुक्त यांना देणेसाठी शासनाने जा.क्र.टिपीबी-४३१०/२५०३/प्रक्र.२००/२०१०/नवि-११ दि.३०/०७/२०१० अन्वये मंजूरी दिलेली आहे.

मिरा भाईंदर शहरामध्ये बरेचशे नर्सिंग होम्स, पॉलीक्लिनीक्स्, पॅथॉलॉजी लॅब, डायग्नोसिस सेंटर, क्लिनीक बऱ्याच कालावधीपासून कार्यरत असून त्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकासाठी शासनाने मंजूरी दिल्याप्रमाणे “महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ नुसार”, वरिल प्रमाणेचे फेरबदल महानगरपालिकेच्या मजूर विकास नियंत्रण नियमावलीमध्ये करणेबाबत मा. नगरसेवक, डॉ. श्री. राजेंद्र जैन यांनी दि.०२/०३/२०१६ रोजीच्या पत्रान्वये विनंती केलेली आहे.

सबब सदर प्रकरण निर्णयास्तव मा. महासभेसमोर सादर.

आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि २८/०८/२०१६ वेळ ११.४५

~~मा. स्थायी समिती~~ / महासभा गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. 39

नगरसचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## संगणक विभाग

### मा. महासभा दि.१२/०८/२०१६

## // गोषवारा //

प्रकरण क्र. ( ४३ ) :- मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांसाठी मोफत WIFI Internet सुविधा देणे व Digital Surveillance सह सीसीटीव्ही यंत्रणा उभारणेकामी expression of Interest मागविणेबाबत.

**पार्श्वभुमी :-**

मिरा-भाईंदर महानगरपालिकेने शहरातील नागरिकांसाठी मोफत WIFI internet सुविधा उपलब्ध करुन Digital India च्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकण्यासाठी तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिने महत्वाच्या ठिकाणी सीसीटीव्ही यंत्रणा उभारणे इ. स्वरुपाच्या योजनांचा समावेश असणे आवश्यक आहे.

अश्या प्रकारच्या प्रकल्पांमध्ये आधुनिक तंत्रज्ञान अवगत असलेले मनुष्यबळ व यंत्र सामुग्रीकरिता मोठया प्रमाणात निधीची आवश्यकता असते. अशा प्रकल्पामुळे शहरात नागरिकांच्या सुरक्षिततेत वाढ होऊन त्यांना "माहिती व तंत्रज्ञान" क्षेत्रातील एक आधारभुत सोय उपलब्ध होईल. दरम्यानच्या काळात M/s Intechonline Pvt Ltd, Thane यांचेकडुन याबाबत प्रस्ताव प्राप्त झाला असुन त्याबाबत मा. आयुक्त सो. यांच्या दालनात, मा. उपायुक्त(मु.), मा. मुख्यलेखापरिक्षक व सिस्टम मॅनेजर यांचे समक्ष त्याचे सादरीकरण करण्यात आले आहे.

**प्रस्ताव :**

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रांत नागरिकांसाठी मोफत WIFI सुविधा देणे व Digital Survellance सह सीसीटीव्ही यंत्रणा उभारणे, संचलन व निगा देखभाल करणे तसेच त्यातुन महापालिकेस उत्पन्न मिळवुन देणेकरीता ठेकेदाराची नियुक्ती करणेकामी इच्छुक ठेकेदाराकडुन स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI) मागविण्याकरिता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे. सदर कामी मिरा-भाईदर महापालिकेकडुन कोणताही भांडवली व महसुली खर्च करावा लागणार नाही.

**आधुनिक तंत्रज्ञान :**

महापालिकेच्या मालकीच्या सर्व प्रकारच्या विविध इमारतींवर, पथदिव्यांच्या पोलवर आवश्यकतेनुसार WIFI Access point यंत्रणा उभारुन मोफत WIFI सुविधा देण्यात येणार आहे. या अंतर्गत मिरा-भाईंदर शहरातील इतर सर्व ठिकाणी सर्व नागरिकांसाठी १ mbps क्षमतेची मोफत WIFI Internet सुविधा देण्यात येणार आहे. यंत्रणा कार्यरत झाल्यांनतर ४ वर्षानंतर मिरा भाईंदर शहरातील सर्व ठिकाणी २ mbps क्षमतेची WIFI internet सुविधा ही मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना विनामुल्य दयावयाची आहे.
सदर प्रकल्पांतर्गत सुरक्षिततेच्या दृष्टीने शहरातील मुख्य ठिकाणी एकुण ३०० कॅमेरे (IP Based Night Vision Camera, PTZ Camera) बसविण्यात येणार आहेत.

**प्रकल्पाची वित्तीय रुपरेषा (Financial Model)**

१) सदर प्रकल्पासाठी लागणारा संपुर्ण भांडवली व महसुली खर्च संबंधित ठेकेदाराने करावयाचा आहे.

२) सदर प्रकल्पासाठी आवश्यकतेनुसार महापालिकेच्या विविध इमारतींवर व पथदिव्यांच्या पोलवर WIFI Access point करीता आवश्यक उपकरणे बसविण्यासाठी जागा विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येईल. महापालिकांच्या इमारतींवर उपकरणांसाठी आवश्यक विज पुरवठा हा महापालिकेकडुन विनामुल्य देण्यात येईल. या व्यतिरिक्त इतर कोणत्याही ठिकाणी अश्याप्रकारच्या यंत्रणेसाठी लागणारा विज पुरवठा हा ठेकेदाराने स्वखर्चाने व त्यांच्या नांवे उपलब्ध करुन घ्यावयाचा आहे.

३) मिरा-भाईंदर महानगरपालिका संबंधित ठेकदाराच्या कोणत्याही कर्जासाठी हमीदार (Guarantor) राहणार नाही.

४) ठेकदाराने प्रकल्पांतर्गत सर्व उपकरणे तसेच त्यांचे कर्मचाऱ्यांचा विमा नियमानुसार स्वखर्चाने काढावयाचा आहे.
५) सदर प्रकल्पांतर्गत कोणतीही दुर्घटना झाल्यास त्याची संपुर्ण कायदेशीर जबाबदारी संबंधित ठेकेदाराची राहिल.

**प्रकल्पांतर्गत प्राप्त होणाऱ्या उत्पन्नाबाबत :-**

१. मिरा-भाईंदर शहरातील इतर सर्व ठिकाणी १ mbps क्षमतेची WIFI सुविधा ही मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना विनामुल्य दयावयाची आहे. तथापी, याकरीता नागरिकांना त्यांची नांवे एकदाच प्रणाली मध्ये नोंदणी करणे आवश्यक असुन त्यासाठी ठेकेदाराकडुन नोंदणी शुल्क रु. १००/- (रुपये शंभर मात्र) आकारण्यात येतील. या व्यतिरिक्त देण्यात येणाऱ्या इतर High Speed WIFI सेवांसाठी ठेकेदार नागरिकांकडुन Plan प्रमाणे मुल्य आकारेल.

२. ठेकेदाराकडुन देण्यात येणाऱ्या High Speed WIFI सेवांसाठी ठेकेदार नागरिकांकडुन Plan प्रमाणे आकारणी करेल व त्या उत्पन्नातुन (सर्व कर वगळुन) किमान १० टक्के हिस्सा महापालिकेस देणे बंधनकारक राहिल.

३. सदर सेवेअंतर्गत ठेकेदारास प्राप्त होणाऱ्या उत्पन्नांवर लागु होणारे सर्व प्रकारचे वैधानिक कर/आकार संबंधित ठेकेदार स्वखर्चाने अदा करतील.

४. ठेकेदाराने याकामी स्वखर्चाने रस्ते दुरुस्त करुन देण्याच्या अटीवर ठेकेदारास रस्ते खोदण्याची परवानगी देण्यात येईल. याकामी मिरा भाईंदर शहरात ५८७७१ मीटर नेटवर्क उभारावे लागणार आहे.

**ठेकेदाराच्या जबाबदाऱ्या :-**

१. सदर प्रकल्पांतर्गत ठेकेदाराने स्वखर्चाने आवश्यकतेनुसार WIFI Access point उभारण्याकरीता आवश्यक यंत्रसामुग्रीचा पुरवठा व संचलन स्वखर्चाने करावयाचे आहे. प्रकल्पासाठी आवश्यक इंटरनेट कनेक्टीव्हिटी, सर्व प्रकारची केबल इत्यादी वरील भांडवली व महसुली खर्च ठेकेदाराने करावयाचा आहे.

२. या प्रकल्पांतर्गत ठेकेदारने स्वखर्चाने सुरक्षेततेच्या दृष्टीने शहरातील मुख्य ठिकाणी एकुण ३०० कॅमेरे (IP Based Night Vision Camera and PTZ Camera) बसविणे आवश्यक आहे. याकरीता आवश्यक इंटरनेट कनेक्टिव्हिटी, सर्व प्रकारची केबल इत्यादी वरील भांडवली व महसुली खर्च ठेकेदाराने करावयाचा आहे.

३. मिरा-भाईंदर शहरातील इतर सर्व ठिकाणी १ mbps क्षमतेची WIFI internet सुविधा ही मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना विनामुल्य दयावयाची आहे. यंत्रणा कार्यरत झाल्यांनतर ४ वर्षानंतर मिरा भाईंदर शहरातील सर्व ठिकाणी २ mbps क्षमतेची WIFI internet सुविधा ही मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना विनामुल्य दयावयाची आहे.

४. प्रकल्प कालावधीत सदर प्रकल्पाचे दैनंदिन संचलन जसे कि, तांत्रिक कर्मचाऱ्यांची नेमणुक करणे, सर्व समावेशक निगा, देखभाल व दुरुस्ती करणे या बाबी ठेकेदाराने करावयाचे आहे. त्याचा सर्व खर्च, त्यांच्या कर्मचाऱ्यांच्या वेतनासह ठेकेदाराने करावयाचा आहे. याकरीता आवश्यक असणारी जागा व इतर बाबी ठेकेदाराने स्वखर्चाने उपलब्ध करुन घ्यावयाचे आहे.

५. ठेकेदाराने प्रकल्पांतर्गत सर्व उपकरणे तसेच त्यांचे कर्मचाऱ्यांचा विमा नियमानुसार स्वखर्चाने काढावयाचा आहे.

६. ठेकेदाराने WIFI internet सेवा व कनेक्टिव्हिटी साठी सर्व प्रकारच्या तांत्रिक व वैधानिक मंजुऱ्या ठेकेदाराने काढावयाचे असुन त्यासाठी आवश्यक खर्च ठेकेदाराने करावयाचा आहे.

७. मिरा भाईंदर शहरातील सर्व नागरिकांना मिरा भाईंदर शहरात विनामुल्य स्मार्ट कॉल ॲप्लीकेशन ठेकेदाराने उपलब्ध करावयाचे आहे.

८. महानगरपालिकेसाठी SMS and Promotions regarding Citizen Safety, Citizen Warning ठेकेदाराने विनामुल्य उपलब्ध करावयाचे आहे.

९. WIFI Devices साठी महानगरपालिकेच्या Poles चा वापर करावा लागणार आहे. याकामी अंदाजे ६४४ Poles ची आवश्यकता लागणार असून अंदाजे १०० Poles ठेकदारास स्वखर्चाने उभे करावे लागतील.

१०. सदर प्रकल्पासाठी आवश्यकतेनुसार पथदिव्यांच्या पोलवर बसविण्यात आलेल्या WIFI Access point करिता विज वितरण कंपनीकडून योग्य क्षमतेचा वीजपुरवठा संबंधित ठेकेदारास स्वतःचे नावावर स्वखर्चाने घ्यावा लागेल. त्यापोटी येणारे विज बिल हे विज वितरण कंपनीस भरावयाचे आहे.

११. ठेकेदाराच्या सदरच्या प्रकल्पापमुळे कुठलीही दुर्घटना झाल्यास त्याची संपूर्ण कायदेशीर जबाबदारी ठेकेदाराची राहील.

१२. महापालिकेच्या सर्व कार्यालयांमध्ये आवश्यकतेनुसार इंटरनेट कनेक्टिव्हीटी मोफत द्यावयाची आहे. महापालिकेचे अस्तित्वातील मुख्य डेटा सेंटर हे ठेकेदाराने स्वखर्चाने स्वतःच्या जागेत स्थलांतरित करुन त्याचे निगा, देखभाल, दुरुस्ती व संचलन करावयाचे आहे. तसेच या डेटा सेंटरसाठी Disaster Recovery (D. R.) साईट ही ठेकेदाराने स्वखर्चाने उपलब्ध करुन द्यावयाचे आहे.

१३. या प्रकल्पांतर्गत वापरण्यात येणा-या सर्व प्रकारची उपकरणे हि भारतीय/आंतरराष्ट्रीय मानंकानुसार असावीत तसेच त्या संबंधित प्राधिकृत केलेल्या तत्सम संस्थेकडून प्रमाणित केलेल्या असाव्यात.

१४. सदर ठेक्याचा कालावधी संपल्यानंतर संबंधित ठेकेदाराने सदरचा प्रकल्प व अनुषंगिक बाबी चालू स्थिती मध्ये विनामूल्य व कोणत्याही दायित्वाशिवाय मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या मालकीच्या करावयाच्या आहे. सदर प्रकल्पातंर्गत कोणतीही जोखीम/दायित्व निर्माण झाली असल्यास त्याची पूर्तता ठेकेदाराने करावयाची आहे.

<u>मिरा-भाईंदर महानगरपालिकेची जबाबदारी</u> –

१. सदर प्रकल्पासाठी WIFI Access point व यंत्रणा उभारण्यासाठी महापालिकेच्या सर्व इमारतींवरील गरजेनुसार जागा विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच यासाठी लागणारा विजपुरवठा हा महापालिकेकडून विनामुल्य देण्यात येईल.

२. सदर प्रकल्पासाठी WIFI Access point व यंत्रणा उभारण्यासाठी महापालिकेच्या अस्तित्वातील पथदिव्यांचे पोल आवश्यकतेनुसार ठेकेदारास विनामुल्य उपलब्ध करण्यात येईल. मात्र यासाठी आवश्यक विज पुरवठा ठेकेदाराने स्वखर्चाने व स्वतःच्या नावे विज वितरण कंपनीकडून घ्यावयाचा आहे.

३. याकरिता आवश्यक ना हरकत दाखला व इतर सहाय्य महापालिकेतर्फे देण्यात येईल. वीज पुरवठा कंपनीकडून वीज कनेक्शन घेण्यासाठी आवश्यक सहकार्य महापालिकेतर्फे देण्यात येईल.

**BOT प्रकल्प कालावधी**

सदर ठेक्याचा प्रकल्प कालावधी १० वर्षे राहिल.

**महापालिकेचा खर्च व परतावा विश्लेषण (Cost Benefit Analysis)**

सदर प्रकल्पासाठी मिरा-भाईंदर महानगरपालिकेस कोणताही भांडवली व महसूली खर्च करावा लागणार नाही. महापालिका क्षेत्रात नागरिकांना मोफत WIFI सुविधा उपलब्ध होईल. तसेच महापालिकेच्या सर्व महत्वाच्या इमारतीना मोफत हाय स्पिड इंटरनेट उपलब्ध होईल. तसेच मिरा-भाईंदर येथिल महापालिकेस मुख्य डेटा सेंटर व Hosting services हे ठेकेदाराच्या स्वतःच्या जागेत स्थलांतरित केल्यामुळे सध्या त्यावर होणा-या मोठया खर्चात बचत होईल.

**निविदाकार निवडण्याचे निकष (Bid Citeria)**

१. जो निविदाकार High Speed WIFI सेवांसाठी नागरिकांकडून प्राप्त होणा-या उत्पन्नाचा जास्तीत जास्त हिस्सा महापालिकेस देईल.

२. Quality Based Revenue System (QBRS) अंतर्गत ५० % गुण हे गुणवत्तेसाठी असुन उर्वरीत ५०% गुण हे महापालिकेस देण्यात येणा-या उत्पन्नाच्या आधारे ठरविण्यात येईल.

३. प्रकल्पाचे संकल्पन व आरेखन हे M/s Intecholine Pvt Ltd., Thane यांनी तयार करुन प्रथमःत मिरा भाईंदर महानगरपालिकेकडे सादर केलेले आहे.

सबब, वरील बाबी नमूद करुन मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात नागरिकांसाठी मोफत WIFI Internet सुविधा देणे व Digital Survellance सह सीसीटीव्ही यंत्रणा उभारणे, संचलन व निगा देखभाल करणे तसेच त्यातून महापालिकेस उत्पन्न मिळवून देणेकरता PPP (Public Private Participation) स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest) मागविणेसाठी शिफारस आहे. करिता मा. महासभेच्या मंजूरीसाठी प्रस्ताव सादर.

(मूळ प्रतिवर मा. आयुक्त सो. यांची स्वाक्षरी असे)

(निलेशकुमार महाले)
उपायुक्त(मु.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. ८/८/२०१६ वेळ ३.२०

मा. ~~स्थायी समिती~~ / ~~.......~~ गोषवारा

नोंद रजिस्टर क्र. .......२५..........

लिपीक

नगरसचिव विभाग.

(१)

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १२/०८/२०१६

## गोषवारा

प्रकरण क्र. ४४ **श्री. दादासाहेब खेत्रे, (निलंबीत) विभागप्रमुख, अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग व श्री. दिलीप जगदाळे, (निलंबीत) प्रभाग अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र.०६ निलंबन कायम करणेबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका आस्थापनेवर श्री. दादासाहेब खेत्रे, विभागप्रमुख, अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग यांना जा.क्र.मनपा/सा.प्र.वि./निलंबन/१८६४/२०१६, दि.०६/०२/२०१६ रोजीच्या आदेशान्वये तसेच श्री. दिलीप जगदाळे, प्रभाग अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र.०६ यांना जा.क्र.मनपा/सा.प्र.वि./निलंबन/१८६५/२०१६, दि.०६/०२/२०१६ अन्वये शहरातील दैनंदिन होणारी अतिक्रमणे /अनधिकृत बांधकामावर तोडक कारवाई करणे/नियंत्रण करणेची जबाबदारी विभागप्रमुख/प्रभाग अधिकारी यांची आहे. तथापी प्रभागाअंतर्गत नव्याने होणाऱ्या अनधिकृत बांधकामावर तातडीने कारवाई करणे, बांधकामे निष्कसित करणे, अतिक्रमणे/अनधिकृत बांधकाम करणारे विकासक यांचेवर विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन न्यायालयात दावा दाखल करणे याबाबी वेळच्यावेळी निदर्शनास आणून देखील, तसेच आयुक्त यांनी वेळोवेळी दिलेले निर्देश यावर कोणत्याही प्रकारची कारवाई न झाल्यामुळे प्रभाग समिती अंतर्गत अनधिकृत बांधकामे उभी राहण्यास मदत झाल्याचे, तसेच सदरची अनधिकृत बांधकामे व्याप्त झाल्याचे दिसून येते. सदरच्या अनधिकृत बांधकामावर वेळच्यावेळी बांधकाम तोडण्याची कारवाई न अवलंबिता प्रत्येकवेळी वेगवेगळी भुमिका घेऊन अनधिकृत बांधकाम पूर्ण करण्यास सहकार्य केल्याचे दिसून आलेले आहे. त्यामुळे विहित वेळेत सोपविलेली कामे न करणेकामी कसुर झाल्याने त्यांना निलंबीत करण्यात आलेले आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात १९४९ चे कलम ५३ व ५६ अन्वये सहाय्यक आयुक्त (वर्ग-०२) या समकक्ष पदावरील अधिकाऱ्यांची नियुक्ती व काढून टाकण्याचे अधिकार महानगरपालिकेच्या महासभेकडे निहित आहेत. त्याअनुषंगाने सक्षम प्राधिकारणाने नियुक्त केलेल्या असा कोणत्याही अधिकाऱ्यांस किंवा कर्मचाऱ्यास महानगरपालिकेचा आदेश होईपर्यंत निलंबीत करु शकेल, व अशाप्रकारे निलंबीत करण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे निलंबन व त्यासंबंधीची कारणे आयुक्तांनी ताबडतोब महानगरपालिकेस कळविले पाहिजेत व महानगरपालिकेने अशा

निलंबनाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या मुदतीत असे निलंबन कायम केले नाही, तर ते निलंबन संपुष्टात येईल अशाप्रकारची महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात १९४९ चे कलम ५६ (१) (ब) मध्ये तरतुद आहे.

सबब श्री. दादासाहेब खेत्रे, (निलंबीत) विभागप्रमुख, अतिक्रमण व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग व श्री. दिलीप जगदाळे, (निलंबीत) प्रभाग अधिकारी, प्रभाग कार्यालय क्र.०६ यांना दि.०६/०२/२०१६ रोजी निलंबीत केलेले आहेत. तरी निलंबीत अधिकाऱ्यांचे निलंबन कायम करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात १९४९ चे कलम ५६ (१) (ब) नुसार मा.महासभेची मंजुरी मिळणेस शिफारस आहे.

18/2/16

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

1915 12.00

गोषवारा प्राप्त दि. १९/५/२०१६ वेळ १२.००
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. २५
लिपिक १९/५/१६
नगरसचिव विभाग.

(9)

सामान्य प्रशासन विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. १२/ ०८ /२०१६

## ।। गोषवारा।।

प्रकरण क्र. ४५ :- अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांच्याकरीता पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांच्या आस्थापनेवरील पोलीस दलातील विविध संवर्गातील निर्माण केलेल्या ७० पदांना मुदतवाढ मिळणेबाबत...

संदर्भ :- गृह विभाग मंत्रालय, दुसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई - ४०० ०३२ शासन निर्णय क्र. सीटीई-०३१६/प्र.क्र.६/पोल-३, दि.१८/०३/०१६.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी पोलीस अधीक्षक ठाणे, ग्रामीण यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली पोलीस आयुक्त ठाणे, यांच्या आस्थापनेवर एकुण ५३ पदे व महानगरपालिका क्षेत्रात नागरी गुन्हांची नोंदणी तपास खटला भरण्यासाठी स्थापन करावयाच्या स्वतंत्र कक्षासाठी एकुण १७ पदे अशी एकुण ७० पदे निर्माण करुन त्यांच्या सेवा महानगरपालिकेकरीता उपलब्ध करुन देण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर पदांना गृह विभागाने दि. ०१ सप्टेंबर, २०१५ ते दि. २९ फेब्रुवारी, २०१६ पर्यत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

शासन निर्णय क्र. सीटीई-०३१६/प्र.क्र.६/पोल-३, दि.१८/०३/०१६ मध्ये एकुण ७० पदांना दि. ०१ मार्च, २०१६ ते दि. ३० सप्टेंबर, २०१६ पर्यत खालील अटी/शर्तीच्या अधिन राहून शासनाने मुदतवाढ दिलेली आहे.

१) सहा महिन्यांपेक्षा जास्त काळ रिक्त पदे वगळून उर्वरीत पदांना मुदतवाढ देण्यात यावी. तसेच पदे ज्या कारणास्तव ज्या अटी व शर्तीच्या अधिन राहुन मंजूर केली आहेत त्याचे पालन करण्यात यावे.

२) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/ वित्तिय सुधारणा-१ दि. १० सप्टेंबर, २००१ आणि क्र. असंक-१००४/प्र.क्र.१२/२००४/ वित्तिय सुधारणा-१ दि. १९ ऑगस्ट, २०१४ नुसार पदांच्या आढाव्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करुन

कार्यालयाचा सुधारित आकृतीबंध उच्च स्तरीय सचिव समितीकडून अंतिमतः मान्य करुन घेण्याबाबतचा प्रस्ताव तात्काळ शासनास सादर करण्यात यावा.

३) आस्थापनेवरील मंजूर पदांचा आढावा घेताना शासनाच्या कार्यपध्दतीतील तंत्रज्ञानाचा वाढता वापर, काळानुरुप शासनाच्या मुष्यबळात बदल व मनुष्यबळाचा परिणामकारक वापराची आवश्यकता या बाबीचा विचार करुन अनावश्यक बदल व मनुष्यबळाचा परिणामकारक वापराची आवश्यकता या बाबीचा विचार करुन अनावश्यक पदे कमी करण्याचाही विचार करावा.

४) कोणत्याही परिस्थितीत सप्टेंबर-२०१६ पर्यंत पदांचा आढावा उच्चस्तरीय समितीसमोर ठेवून मान्यता घेण्याबाबत वित्त विभागाने संदर्भाधिन क्र. ०३ च्या शासन निर्णयानूसार सुचित केलेले आहे. ही बाब विचारात घेता सप्टेंबर २०१६ अखेर पर्यंत पदाच्या आढाव्याची कार्यवाही पूर्ण न झाल्यास वरील अस्थायी पदांना त्या पुढील कालावधीसाठी मुदतवाढ न मिळाल्यास व त्यामुळे अधिकारी/कर्मचारी यांच्या वेतन व भत्याचा प्रश्न निर्माण झाल्यास संबंधित कार्यालयाची जबाबदारी राहिल.

५) गृह विभाग, शा.नि दि. ०१ सप्टेंबर, २०१४ मधील अट क्र. १ ते ९ हया मिरा भाईंदर महानगरपालिकेवर बंधनकारक राहतील. सदर अटींचे रितसर पालन होत असल्याबाबतचा मिरा भाईंदर महानगरपालिका व पोलीस अधीक्षक, ठाणे ग्रामीण यांनी संयुक्तपणे तपासून सादर केलेला तपशील पुढील मुदतवाढीच्या प्रस्तावासोबत सादर करावा. सदर तपशील सादर केल्याशिवाय सदरहू पदांना पुढील मुदतवाढ मिळणार नाही, असे वरील शासन निर्णयात नमुद आहे.

सबब अनधिकृत बांधकामे/अतिक्रमण नियंत्रण व निर्मुलनासाठी वरील शासन निर्णयाप्रमाणे पोलीस अधीक्षक ठाणे, ग्रामीण यांच्या आस्थापनेवरील पोलीस दलातील ७० पदाना मुदतवाढ देणेबाबत ही सभा आर्थिक व प्रशासकीय मंजूरी देत आहे.

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा प्राप्त दि. ०२/०५/२०१६ वेळ १०:२५ वा.

~~मा. स्थायी समिति~~ / ... च्या गोषवारा

नोंद रजिस्टर अ. क्र. १८

लिपिक

नगरसचिव विभाग.

# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि.१२/८/२०१६
## बांधकाम विभाग
## // सुधारीत गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ४६ )** :- रस्ते, चौक, वास्तू नामकरणाबाबत...

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, चौक, वास्तु यांची नामकरणे मा. महासभेच्या मान्यतेने करण्यात येत आहेत. याबाबत पदाधिकारी सन्माननीय नगरसेवक/नगरसेविका यांच्यामार्फत सुचविण्यात आलेले प्रस्ताव अंतिम निर्णयासाठी मा. महासभेपुढे ठेवण्यात येतात. तथापी बऱ्याच वेळेत महानगरपालिकेमार्फत प्रशासनाच्या प्रस्तावाव्यतिरिक्त देखिल रस्ते, चौक, वास्तु नामकरणाच्या सुचना देवुन ठराव पारीत होत असतात, त्यामुळे सदर रस्ते, चौक, वास्तु यांना पुर्वी नावे दिली आहेत किंवा कसे याबाबत तपासणी न करताच निर्णय झाल्याने त्यांच्या अंमलबजावणीस अडचणी निर्माण होऊन ज्या महापुरुषांची नावे पुन्हा देण्यात येतात, त्याबाबत वाद निर्माण होत असतात. मा. महासभा दि.१५/१०/२०१५ ठराव क्र.७८ च्या अनुशंगाने मा. महापौर यांनी सदर ठरावाच्या पूर्वी देण्यात आलेली कोणतीही नावे बदलण्यात येऊ नये याबाबत निदेश दिले आहेत. सद्यस्थितीत एकच रस्ता, वास्तु, चौक यांना पुनश्च नावे दिल्याच्या खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | प्रथम झालेला निर्णय | तद्नंतर झालेले ठराव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | प्लेझंट पार्क रस्ता | राष्ट्रकवी रविद्रंनाथ टैगोर मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | महात्मा जोतिबा फुले मार्ग<br>मा. महासभा दि.१२/१०/२००६<br>ठराव क्र. ६०<br>कै. केशव हरी भोईर मार्ग<br>मा. महासभा दि.०६/०७/२०१३<br>ठराव क्र. २३ |
| २ | भाईंदर (पुर्व) व (पश्चिम) जोडणारा जैसल पार्क येथील सबवे. | लोकमान्य टिळक सबवे<br>मा. महासभा दि.०६/०७/२०१३<br>ठराव क्र. २३ | शहिद भगत सिंह मार्ग<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| ३ | जागृती इमारत ते रेल्वे फाटक पर्यंत रस्ता | महात्मा जोतिबा फुले मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | स्व. श्री. चंदुभाई रामशंकर रावल मार्ग<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| ४ | भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.२१७,२३६ समोरील चौक | सेव्हन स्केअर चौक<br>मा. महासभा दि.१९/११/२००८<br>ठराव क्र. ६३ | आई माता चौक<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| ५ | भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन रिक्षा स्टँड चौक | स्व. परशुराम टावरे चौक, माजी आमदार<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | श्री. नरसिम्हा देव चौक<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| ६ | जैसल पार्क, जैन मंदिर ते राहुल पार्क, आर.एन.पी. पार्क रस्ता | स्व.दिलीप माणिक बाबर मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | मारुती मंदिर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | काशीगाव रा.म.क्र. ८ हॉटेल निलकमल जनता नगर, सरिता डेअरी ते माशाचा पाडा पर्यंतचा रस्ता | श्री. धारावी रोड<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | धारावी देवी मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| ८ | घोडबंदर राष्ट्रीय महामार्ग जकात नाका क्र. ९ ते गावातील बस स्टॉप ते रेतीबंदर वरून राष्ट्रीय महामार्गास जोडणारा रस्ता | धर्मवीर स्व.आनंद दिघे मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | घोडबंदर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| ९ | मिरारोड सृष्टी कॉम्पलेक्स मधील भक्ती वेदांत हॉस्पीटल समोरून जाणारा रस्ता, रॉयल कॉलेज ते सप्तश्री इमारतीपर्यंत | भक्तीवेदांत स्वामी मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | महात्मा गांधी मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२<br>केशव हरि पदाजी भोईर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/११/२००८<br>ठराव क्र. ६३ |
| १० | डॉ. हेडगेवार मार्गावरील सिल्व्हर पार्क वरुन विजय पार्क सृष्टी पर्यंत रस्ता | आचार्य विनोबा भावे मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | ब्रम्हाकुमारीज मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| ११ | बंदरवाडी नाका ते जैसल पार्क चौपाटी पर्यंतचा रस्ता | स्व.सै.स्व.कान्हा बालाजी पाटील मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | राणी लक्ष्मीबाई मार्ग<br>मा. महासभा दि.०६/०७/२०१३<br>ठराव क्र. २३ |
| १२ | जरीमरी तलाव ते ग्रीन व्हिलेज पर्यंत | गावदेवी मंदिर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ | समाजसेवक हाजी गुलाम रसुल पठाण वेस्टर्न पार्क मार्ग<br>मा. महासभा दि.०६/०७/२०१३<br>ठराव क्र. २३ |
| १३ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, सर्व्हे नं. ४७९ ते २९२ पर्यंत जाणारा रस्ता | मगदुम शाह बाबा मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ | महात्मा गांधी मार्ग<br>मा. महासभा दि.१२/१०/२००६<br>ठराव क्र. ६० |
| १४ | जैसल पार्क ते आर.एन.पी. पार्क ते पुढे घोडबंदरकडे जाणारा समुद्र किनारी रस्ता | स्व.सै.गोपाळ दामोदर पाटील मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | पं दिनदमाल उपाध्याय मार्ग<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| १५ | काशिमिरा रोड सर्व्हीस रोड | संपूर्ण रस्त्यास छत्रपती शिवाजी महाराज मार्ग असे नांव आहे. | स्व. राजेश पायलट मार्ग<br>मा. महासभा दि.१२/१०/२००६<br>ठराव क्र. ६० |
| १६ | मिरारोड रेल्वे स्टेशन (दक्षिणेकडून येणारा व मच्छी मार्केट पासून शांतीनगर सेक्टर ३ मधून सेक्टर नं. ५/६ पर्यंत जाणारा रस्ता | स्वामी विवेकानंद मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | आदिनाथ रोड<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| १७ | मिरारोड (पूर्व) सेक्टर नं. १. बी-१७,१८,१९,२०,२१,२२,२३ मधील मैदान | दिनदयाल उपाध्याय मैदान<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ | श्री. नाकोडा भैरव धाम उद्यान<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| १८ | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर ३ मधून सेक्टर नं. २ व १० मधून (रेल्वे लाईन कडून येणारा) शांतीपार्क फेज-३ कडून जाणारा व प्रशांत इमारत/ पुनम सागर बी-१ पर्यंतचा रस्ता | भगवान महावीर मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | घनश्याम महाराज मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | मिरारोड (पूर्व) शांतीपार्क सेंट झेव्हीअर्स हायस्कूल रस्ता | शांतीलाल लल्लूभाई शहा मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ | स्व. महादेव प्रसाद बजरंगलाल जोशी<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| २० | मिरारोड (पूर्व) शांतीनगर सेक्टर ३ व फेज-३ येथील चौक | उमाकांत मिश्रा चौक<br>ग्रामपंचायत काळापासून | संत गुरुगोविंदसिंग चौक<br>मा. महासभा दि. १९/१०/२००५ (५२)<br>श्री सदानंद चौक<br>मा. महासभा दि. १९/१०/२००५ (५२) |
| २१ | मिरारोड (पूर्व)<br>एम.आय.डी.सी. पासून रॉयल कॉलेज ते सृष्टी ते शांतीनगर ते मच्छी मार्केट ते सर्कल ते मनपा कार्यालयापर्यंत | महात्मा गांधी मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा दि.१९/१०/२००५ ठराव क्र. ५२ | केशव हरी पदाजी भोईर मागर्ग<br>मा. महासभा दि.१९/११/२००८<br>ठराव क्र. ६३ |
| २२ | शांतीनगर सेक्टर नं. ४ मैदान | जवाहरलाल नेहरू क्रिडांगण<br>मा. महासभा दि.१९/११/२००८<br>ठराव क्र. ६३ | भारतरत्न स्वर्गीय राजीव गांधी मैदान<br>मा. महासभा दि.३०/०७/२०१०<br>ठराव क्र. २५ |
| २३ | शितल नगर नाका चौक | जवाहरलाल नेहरू चौक<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र.५२ | सेंट जोसेफ चौक<br>मा. महासभा दि.१९/११/२००८<br>ठराव क्र.६३ |

वरील प्रमाणे सर्वात प्रथम नामकरण केलेली नावे अंतिम करून तद्नंतर दिलेली नावे रद्द करण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC-1/16-17/MS/MG-2

[illegible]

(७)

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि.१२/०८/२०१६
## बांधकाम विभाग.
## // गोषवारा //

**प्रकरण क्रमांक ( ४६ )** :- रस्ते, चौक, वास्तू नामकरणाबाबत...

मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील रस्ते, चौक, वास्तु यांची नामकरणे मा. महासभेच्या मान्यतेने करण्यात येत आहेत. याबाबत पदाधिकारी सन्माननीय नगरसेवक/नगरसेविका यांच्यामार्फत सुचविण्यात आलेले प्रस्ताव अंतिम निर्णयासाठी मा. महासभेपुढे ठेवण्यात येतात. तथापी बऱ्याच वेळेत महानगरपालिकेमार्फत प्रशासनाच्या प्रस्तावाव्यतिरिक्त देखिल रस्ते, चौक, वास्तु नामकरणाच्या सुचना देवुन ठराव पारीत होत असतात, त्यामुळे सदर रस्ते, चौक, वास्तु यांना पुर्वी नावे दिली आहेत किंवा कसे याबाबत तपासणी न करताच निर्णय झाल्याने त्यांच्या अंमलबजावणीस अडचणी निर्माण होऊन ज्या महापुरुषांची नावे पुन्हा देण्यात येतात, त्याबाबत वाद निर्माण होत असतात. मा. महासभा दि.१५/१०/२०१५ ठराव क्र.७८ च्या अनुशंगाने मा. महापौर यांनी सदर ठरावाच्या पूर्वी देण्यात आलेली कोणतीही नावे बदलण्यात येऊ नये याबाबत निदेश दिले आहेत. सद्यस्थितीत एकच रस्ता, वास्तु, चौक यांना पुनश्च नावे दिल्याच्या खालील बाबी निदर्शनास आल्या आहेत.

| अ.क्र. | ठिकाण | प्रथम झालेला निर्णय | तद्नंतर झालेले ठराव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | प्लेझंट पार्क रस्ता | राष्ट्रकवी रविद्रंनाथ टैगोर मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | महात्मा जोतिबा फुले मार्ग<br>मा. महासभा दि.१२/१०/२००६<br>ठराव क्र. ६०<br>कै. केशव हरी भोईर मार्ग<br>मा. महासभा दि.०६/०७/२०१३<br>ठराव क्र. २३ |
| २ | भाईंदर (पुर्व) व (पश्चिम) जोडणारा जैसल पार्क येथील सबवे. | लोकमान्य टिळक सबवे<br>मा. महासभा दि.०६/०७/२०१३<br>ठराव क्र. २३ | शहिद भगत सिंह मार्ग<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| ३ | जागृती इमारत ते रेल्वे फाटक पर्यंत रस्ता | महात्मा जोतिबा फुले मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | स्व. श्री. चंदुभाई रामशंकर रावल मार्ग<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| ४ | भाईंदर (पुर्व) आरक्षण क्र.२१७,२३६ समोरील चौक | सेव्हन स्केअर चौक<br>मा. महासभा दि.१९/११/२००८<br>ठराव क्र. ६३ | आई माता चौक<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| ५ | भाईंदर (प.) रेल्वे स्टेशन रिक्षा स्टँड चौक | स्व. परशुराम टावरे चौक, माजी आमदार<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | श्री. नरसिंम्हा देव चौक<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| ६ | जैसल पार्क, जैन मंदिर ते राहुल पार्क, आर.एन.पी. पार्क रस्ता | स्व.दिलीप माणिक बाबर मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | मारुती मंदिर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | काशीगाव रा.म.क्र. ८ हॉटेल निलकमल जनता नगर, सरिता डेअरी ते माशाचा पाडा पर्यंतचा रस्ता | श्री. धारावी रोड<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | धारावी देवी मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| ८ | घोडबंदर राष्ट्रीय महामार्ग जकात नाका क्र. ९ ते गावातील बस स्टॅाप ते रेतीबंदर वरून राष्ट्रीय महामार्गास जोडणारा रस्ता | धर्मवीर स्व.आनंद दिघे मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | घोडबंदर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| ९ | मिरारोड सृष्टी कॉम्पलेक्स मधील भक्ती वेदांत हॉस्पीटल समोरून जाणारा रस्ता, रॉयल कॉलेज ते सप्तश्री इमारतीपर्यंत | भक्तीवेदांत स्वामी मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | महात्मा गांधी मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२<br>केशव हरि पदाजी भोईर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/११/२००८<br>ठराव क्र. ६३ |
| १० | डॉ. हेडगेवार मार्गावरील सिल्व्हर पार्क वरुन विजय पार्क सृष्टी पर्यंत रस्ता | आचार्य विनोबा भावे मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | ब्रम्हाकुमारीज मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ |
| ११ | बंदरवाडी नाका ते जैसल पार्क चौपाटी पर्यंतचा रस्ता | स्व.सै.स्व.कान्हा बालाजी पाटील मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | राणी लक्ष्मीबाई मार्ग<br>मा. महासभा दि.०६/०७/२०१३<br>ठराव क्र. २३ |
| १२ | जरीमरी तलाव ते ग्रीन व्हिलेज पर्यंत | गावदेवी मंदिर मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ | समाजसेवक हाजी गुलाम रसुल पठाण वेस्टर्न पार्क मार्ग<br>मा. महासभा दि.०६/०७/२०१३<br>ठराव क्र. २३ |
| १३ | छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, सर्व्हे नं. ४७९ ते २९२ पर्यंत जाणारा रस्ता | मगदुम शाह बाबा मार्ग<br>मा. महासभा दि.१९/१०/२००५<br>ठराव क्र. ५२ | महात्मा गांधी मार्ग<br>मा. महासभा दि.१२/१०/२००६<br>ठराव क्र. ६० |
| १४ | जैसल पार्क ते आर.एन.पी. पार्क ते पुढे घोडबंदरकडे जाणारा समुद्र किनारी रस्ता | स्व.सै.गोपाळ दामोदर पाटील मार्ग<br>मा. स्थायी समिती सभा<br>दि.०६/१०/२००१ ठराव क्र. २६३ | पं दिनदमाल उपाध्याय मार्ग<br>मा. महासभा दि.१५/१०/२०१५<br>ठराव क्र. ७८ |
| १५ | काशिमिरा रोड सर्व्हीस रोड | संपूर्ण रस्त्यास छत्रपती शिवाजी महाराज मार्ग असे नांव आहे. | स्व. राजेश पायलट मार्ग<br>मा. महासभा दि.१२/१०/२००६<br>ठराव क्र. ६० |

वरील प्रमाणे सर्वात प्रथम नामकरण केलेली नावे अंतिम करून तदनंतर दिलेली नावे रद्द करण्यास शिफारस आहे.

आयुक्त
मिरा-भाईंदर महानगरपालिका

PC3/16-17/DK/MG-4

गोषवारा प्राप्त दि. २१/८/२०१८ वेळ १०.४५
मा. स्थायी समिती / महासभा गोषवारा
नोंद रजिस्टर अ. क्र. ......३६..........
लिपिक
नगरसचिव विभाग.

सामान्य प्रशासन विभाग

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## मा. महासभा दि. १२/०८ /२०१६
## ।। गोषवारा ।।

प्रकरण क्र. ८७ भारतरत्न पंडित भिमसेन जोशी रुग्णालयासाठी वैद्यकीय अधिकारी संवर्गातील पदांकरीता निवड केलेल्या उमेदवारांच्या नियुक्तीस मान्यता मिळणेबाबत...

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार भाईंदर (प) येथील भारतरत्न पंडित भीमसेन जोशी रुग्णालय हे मिरा भाईंदर महानगरपालिकेने त्वरीत कार्यान्वित करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने विविध संवर्गातील स्थायी वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) पदावर भरती करणेकरीता दि.२९/०६/२०१६ रोजी दैनिक सकाळ, दै. मिड डे, साप्ताहिक राजबंजारा, साप्ताहिक परशुराम समाचार या वृत्तपत्रात व महानगरपालिकेच्या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

त्यानुसार पात्र उमेदवारांची दि.२०/०७/२०१६ रोजी थेट मुलाखत घेऊन निवड व प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर निवड व प्रतिक्षा यादीमधील उमेदवारांची नावे खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | निवड झालेल्या उमेदवारांचे नाव | पद | प्रवर्ग |
|---|---|---|---|
| | | **निवड यादी** | |
| १. | डॉ. सकपाळ आशिष हरिश्चंद्र | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| २. | डॉ. भदगरे श्रध्दा सुधीर | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला (महिला) |
| ३. | डॉ. माने अश्विनी गौतम | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| ४ | डॉ. कासले आशिष प्रकाशराव | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | इमाव |
| | | **प्रतिक्षा यादी** | |
| १. | डॉ. गायकवाड मोहन गोविं | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| २. | डॉ. गायकवाड उमाकांत राजाराम | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |
| ३. | डॉ. वानखेडे गिरीश शिरीष | वैद्यकीय अधिकारी (वेतनश्रेणी – १५६००-३९१०० ग्रे.पे.५४००) | खुला |

(2)

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५३(१) नुसार "महानगरपालिकेचा जो अधिकारी सहा. आयुक्त या पदाशी समतुल्य असलेले किंवा त्यापेक्षा उच्च दर्जाच्या पदावर आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेकडे निहित आहेत."

त्यामुळे वरील निवड व प्रतिक्षा यादीतील उमेदवार वैद्यकीय अधिकारी (वर्ग-०१) या संवर्गातील असल्यामुळे त्यांचे नियुक्तीस मान्यता मिळणेस विनंती आहे.

28/03/16

(अच्युत हांगे)
आयुक्त
मिरा भाईंदर महानगरपालिका

गोषवारा 30 /06/२०१६ ला 0.४.

नोंद रजिस्टर क्र. 34

सचिव विभाग.

# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक :- ०९/०८/२०१६.

## मा. महासभा दि. १२/०८/२०१६
पुरक घोषणा

प्रति,
सन्मा. श्री./श्रीमती. ------------------------------------

नगरसेवक/नगरसेविका,
मिरा भाईंदर महानगरपालिका

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील अनुसूची प्रकरण २ नियम १ (ज) अन्वये दिनांक १२/०८/२०१६ रोजी आयोजित केलेल्या मा. महासभेच्या विषयपत्रिकेमध्ये पुढील विषय समाविष्ट करणेची पुरक घोषणा करण्यांत येत आहे.

| प्र.क्र. | विषय |
|---|---|
| ५० | सन्मा. सदस्य डॉ. आसिफ शेख यांचा दिनांक ०३/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>भाईंदर (पूर्व) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट दरम्यान तीन उड्डाणपुल बांधण्याऐवजी काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट मार्गे पुर्वीच्या रेल्वे फाटकावरुन भाईंदर (प.) पर्यंत थेट एकच एलीवेटेड रोड (थेट उन्नत मार्ग) बांधून आवश्यक त्या ठिकाणी रॅम्प तयार करणे. |
| ५१ | सन्मा. सदस्य डॉ. आसिफ शेख यांचा दिनांक ०४/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>महाराष्ट्र विधानमंडळातील सदस्य/आमदारांप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेतील सदस्य/नगरसेवकांना मनपाचे बोधचिन्ह असलेले बिल्ले (बॅच) देणेबाबत. |
| ५२ | सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक ०४/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>खाजगी शाळांमध्ये अग्निरोधक यंत्रणा व सी.सी.टी.व्ही. कॅमेरे बसविणेबाबत. |
| ५३ | सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक ०४/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>महापालिका शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळा सुरु होऊन दोन महिने झाले तरी अद्याप शैक्षणिक साहित्यांचे वाटप झाले नाही. |
| ५४ | सन्मा. सदस्य श्री. प्रशांत दळवी यांचा दिनांक ०५/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मैदानांवर होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांना लावण्यात येणाऱ्या भाड्यांमध्ये फेरबदल करणेबाबत. |
| ५५ | सन्मा. सदस्या श्रीम. शर्मिला बगाजी यांचा दिनांक ०५/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>स्वातंत्र्य सेनानी - काका बाप्टीष्टांचे उत्तन भुतबंगला भागात स्मारक उभारण्याबाबत. |
| ५६ | सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक ०५/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>परिवहन सेवेच्या गलथान कारभारा बाबत. |
| ५७ | सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक ०५/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>सी.सी.टी.व्ही. कॅमेरे शहरात बसविणे बाबत. |
| ५८ | सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक ०५/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>झाडांच्या फांद्यांची छाटणी करणारी गाडी विकत घेणे बाबत. |
| ५९ | सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक ०६/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>ओला कचरा, सुका कचरा वेगवेगळ्या डब्यात ठेवणेकरीता गृहनिर्माण संस्थांना वेगवेगळे डब्बे देणेबाबत. |
| ६० | सन्मा. सदस्य श्री. ध्रुवकिशोर पाटील यांचा दिनांक ०६/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>मा. नगरसेवक/नगरसेविका यांच्या मानधनात वाढ करणेबाबत. |
| ६१ | सन्मा. सदस्य श्री. दिनेश जैन यांचा दिनांक ०८/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>महाराष्ट्र शासन निर्णय दि. २७ सप्टेंबर २००८ नुसार दरवर्षी जैन धर्मियांचे पर्युषण पर्वानिमित्त कत्तलखाने व मांस, मटणाची दुकाने बंद ठेवेणेबाबत. |
| ६२ | सन्मा. सदस्या डॉ. नयना वसाणी यांचा दिनांक ०८/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>महाराष्ट्र शासन निर्णय दि. २७ सप्टेंबर २००८ नुसार दरवर्षी जैन धर्मियांचे पर्युषण पर्वानिमित्त कत्तलखाने व मांस, मटणाची दुकाने बंद ठेवेणेबाबत. |
| ६३ | सन्मा. सदस्य श्री. दिनेश जैन यांचा दिनांक ०८/०८/२०१६ रोजीच्या पत्रान्वये दिलेला प्रस्ताव.<br>वेदरशेडकरीता भाडे आकारणीबाबत मंजुर झालेल्या ठरावात सुधारणा करणेबाबत. |

(हरेश ल. पाटील)
महापालिका नगरसचिव
मिरा भाईंदर महानगरपालिका

सचिव/पुप्रो/१०/१ २०१६-१७
दि. ०३/०८/१६

# मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रशासकीय कार्यालय, प्रभाग समिती क्र.१
भाईंदर (पश्चिम) ता.जि.ठाणे ४०१ १०१
दुरध्वनी क्रं. २८१९८४१३ भ्रमणध्वनी क्र. ९००४१११७७७

जा. क्र. मनपा/प्र.स.क्र.१/८६/२०१६-१७ दिनांक :-०३/०८/२०१६

प्रकरण क्र. ५० करिता

**दि.१२/०८/२०१६ रोजीच्या मा.महासभेमध्ये "ज" अन्वये प्रस्ताव**

**विषय :- भाईंदर (पुर्व) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट दरम्यान तीन उड्डाणपुल बांधण्याऐवजी काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट मार्गे पुर्वीच्या रेल्वे फाटकावरून भाईंदर (प.) पर्यंत थेट एकच एलीवेटेड रोड (थेट उन्नत मार्ग) बांधून आवश्यक त्या ठिकाणी रॅम्प तयार करणे.**

मिरा-भाईंदर महापालिकेने छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट वाहतुक बेट दरम्यान दिपक हॉस्पिटल, एस.के.स्टोन व प्लेझंट पार्क येथे तीन उड्डाणपुल प्रस्तावित केले आहे. त्यांचे बांधकाम एम.एम.आर.डी.ए मार्फत नियोजित आहे. या उड्डाणपुलामुळे वाहतुक कोडींचे नियोजन होणार असले तरी काही अंशीच उपयोगी ठरणार आहे. परंतू त्याचा विशेष काही फायदा होणार नाही व वाहतुकीची कोंडी तशीच कायम राहण्याची शक्यता आहे. सदर या तीन उड्डाणपुलाऐवजी काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट वाहतुक बेट मार्गे पुर्वीचे रेल्वे फाटकावरून थेट भाईंदर पश्चिमेकडे डायरेक्ट एलिवेटेड रोड (थेट एकच उन्नत मार्ग) निर्माण झाल्यास वाहतुक कोडींचे नियोजन निश्चित होईल. तसेच आवश्यक त्या ठिकाणी रॅम्प तयार केल्यास त्यांचा उपयोग नागरिकांना होईल शिवाय वाहतुक देखील गतिमान होऊन अस्तित्वातील असलेल्या एकमेव भारतरत्न स्व. इंदिरा गांधी उड्डाणपुलाला पर्याय उपलब्ध होईल.

सध्या भाईंदर पश्चिम व भाईंदर पुर्व यांना जोडणारा भारतरत्न स्वर्गीय इंदिरा गांधी हा एकमेव उड्डाणपुल अस्तित्वात असून वाहतुकीसाठी खुला आहे. याच पुलावरून हजारो-लाखोच्या संख्येने दिवस-रात्र वाहतुक सुरू आहे. जर भविष्यात या अस्तित्वातील हा एकमेव उड्डाणपुल नैसर्गिक अथवा तांत्रिक अडचणीमुळे बंद झाल्यास नागरिकांची फारच गैरसोय होईल तसेच भाईंदर पुर्व - भाईंदर पश्चिम वाहतुकीला पर्याय उपलब्ध होणार नाही. त्यामुळे मोठया प्रमाणावर वाहतुकीची कोंडी होऊन नागरिकांच्या रोषाला सामोरे जावे लागण्याची शक्यता नाकारता येणार नाही. काही महिन्यांपुर्वी वसई विरारकडे व गुजरातकडे जाणाऱ्या फाऊंटन हॉटेल समोरील वरसावे येथील खाडी पुलावर तांत्रिक अडचण निर्माण झाल्याने वाहतुकीची प्रचंड कोंडी होऊन अवजड वाहनांना दुरचे अंतर कापून वसई- विराराला जावे लागत होते व तासन तास वाहतुकीची कोडी होत होती. त्याचा बोध घेवून आपण भाईंदर (पुर्व) छत्रपती शिवाजी महाराज मार्गावरील काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट दरम्यान तीन उड्डाणपुल बांधण्याऐवजी काशिमिरा नाका ते गोल्डन नेस्ट मार्गे पुर्वीच्या रेल्वे फाटकावरून भाईंदर (प.) पर्यंत थेट एकच एलीवेटेड रोड (थेट उन्नत मार्ग) बांधल्यास व आवश्यक त्या ठिकाणी रॅम्प तयार केल्यास त्याचा नागरिकांना भरपुर फायदा होईल व वाहतुकीची कोंडी देखील होणार नाही.

तरी सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे घेण्यांत यावा.

(डॉ.आसिफ शेख)
सभापती
माजी विरोधी पक्ष नेता

प्रति,
मा. नगरसचिव,
मिरा-भाईंदर महानगरपालिका

साक्ष दि- 3/8/2016
दुपारी: 12:30 वाजता

मनपा/सचिव/पुप्रो/९९/२/१६-१७
दि. ०४/८/२०१६


मिरा भाईंदर महानगरपालिका
प्रशासकीय कार्यालय, प्रभाग समिती क्र.१
भाईंदर (पश्चिम) ता.जि.ठाणे ४०१ १०१
दुरध्वनी क्रं. २८१९८४१३ भ्रमणध्वनी क्र. ९००४१११७७७


जा. क्र. मनपा/प्र.स.क्र.१/८६/२०१६-१७ दिनांक :- ०४/०८/२०१६

प्रकरण क्र. ५१ करिता

दि. १२/०८/२०१६ रोजीच्या मा.महासभेमध्ये "ज" अन्वये प्रस्ताव

विषय :- महाराष्ट्र विधानमंडळातील सदस्य/आमदाराप्रमाणे मिरा-भाईंदर महानगरपालिकेतील सदस्य/नगरसेवकांना मनपाचे बोधचिन्ह असलेले बिल्ले (बॅच) देणेबाबत.

महाराष्ट्र विधानमंडळातील (विधानसभा, विधानपरिषद) सदस्य/ आमदारांची ओळख पटण्यासाठी व त्यांचा योग्य तो मान सन्मान राखला जावा याकरीता तसेच विधीमंडळ सभागृहात व मंत्रालयात आमदारांना सहज प्रवेश मिळावा यासाठी शासनाने विधीमंडळाचे बोधचिन्ह असलेले बिल्ले (बॅच) सर्व आमदारांना दिले आहेत. तसेच याच पध्दतीने बृहन्मुंबई महानगरपालिकेने देखील सर्व नगरसेवकांना बोधचिन्ह असलेले बिल्ले (बॅच) दिले आहेत.

तरी याच धर्तीवर नगरसेवकांची स्वतंत्र ओळख होऊन त्यांचा योग्य तो मान सन्मान राखला जावा व त्यांना सभागृहात व महानगरपालिकेत सहज प्रवेश मिळावा यासाठी महानगरपालिकेचे बोधचिन्ह/प्रतिकृती असलेले बिल्ले (बॅच) तयार करून ते आपल्या मनपा नगरसेवक/नगरसेविकांना वाटण्यात यावेत, असा प्रस्ताव मा.महासभेत सादर करीत आहे.

(डॉ.आसिफ शेख)
सभापती
माजी विरोधी पक्ष नेता

प्रति,
नगरसचिव,
मिरा-भाईंदर महानगरपालिका

પાના ૧૬. ૦૪/૯/૧૬
સમય. ૧૩.૩૦
[signature]
૪/૯/૧૬

आवक/मुख्यालय/३/७८-९८
दि. ०४/०८/२०१६


# ध्रुवकिशोर पाटील
**नगरसेवक**

मिरा-भाईंदर महानगरपालिका

मा. सदस्य : मंडल रेलवे उपभोक्ता सलाहकार समिति, मुंबई - पश्चिम रेल्वे

मा. सदस्य : दक्षता समीती शिधावाटप कार्यालय, भाईंदर.


जा.क्र/मनपा/०८/२२३/२०१६-१७ दि.०४/०८/२०१६

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन (१) (ज) अन्वये दि.१२/०८/२०१६ रोजीच्या मा. महासभेत प्रस्ताव घेणेबाबत**
**महासभा प्रकरण क्र. ५२**

प्रति,
**मा. नगरसचिव सो,**
सचिव विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय – खाजगी शाळां मध्ये अग्नि रोधक यंत्रणा व सी.सी.टी.वी कॅमेरे बसवीणे बाबत.**

महोदय,

राष्ट्रीय इमारत अधिनियमावली (National Building Code) नुसार प्रत्येक शाळांमध्ये अग्निरोधक यंत्रणा बसविणे बंधनकारक आहे. तसेच प्रत्येक शाळांमध्ये सी.सी.टी.वी कॅमेरे बसविणे बाबत महाराष्ट्र शासन व मनपा प्रशासना तर्फे बंधनकारक केले होते. परंतु अद्याप उपरोक्त दोन्ही बाबींची पुर्तता बहुतेक शाळामध्ये केली नसल्यांने विद्यार्थ्यांच्या जिवाशी खेळ सुरु आहे व विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आंहे.

शहरात सुमारे ३०० शाळा असुन सुमारे १ लाख विद्यार्थी शाळेत शिक्षण घेत आहेत. प्रशासना तर्फे दरवर्षी अग्निरोधक यंत्रणा बसविणे करीता नोटिस दिली जाते पण शाळा या नोटिसींना व प्रशासनाला दाद देत नाही, मोजक्याच शाळांनी अग्निरोधक यंत्रणा व सी.सी.टी.वी कॅमेरे बसविले आहेत.

सदरची बाब गंभीर असुन खुप मोठा अनर्थ व अपघात टाळण्यासाठी वेळीच उपाय योजना करणे आवश्यक आहे असे वाटते पण शाळा प्रशासनाला दाद देत नाही की प्रशासन कार्यवाही करत नाही. त्यामुळे सदरचा विषय मा. महासभेत चर्चेला आणून योग्य त्या उपाययोजना करण्याकरीता **"ज"** अन्वये प्रस्ताव मांडत आहे.

आपला विश्वासू

ध्रुवकिशोर पाटील


संपर्क कार्यालय : ३/अ, रोड व्यु, भाजी मार्केट, ६० फूट रोड, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०११०१.
: 98202 96597 / 2819 8989 E-mail : info@dhruvkishor.com Website : www.dhruvkishor.com

প্রাপ্তি ৪।৬।৭৫

৯০০.৭৩.৩৮

৪।৫।৭৫

अधि/मु.प्रो/२३/४/१९६-७८
दि. ०४/०८/२०१६

**ध्रुवकिशोर पाटील**
**नगरसेवक**
मिरा-भाईंदर महानगरपालिका
उप. सदस्य : मंडल रेलवे उपभोक्ता सलाहकार समिति, मुंबई - पश्चिम रेल्वे
उप. सदस्य : दक्षता समीती शिधावाटप कार्यालय, भाईंदर.

जा.क्र/मनपा/०८/२२२/२०१६-१७

दि.०४/०८/२०१६

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन (१) (ज) अन्वये दि.१२/०८/२०१६ रोजीच्या मा. महासभेत प्रस्ताव घेणेबाबत**
**महासभा प्रकरण क्र. ५३**

**प्रति,**
**मा. नगरसचिव,**
सचिव विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय - महापालिका शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळा सुरु होऊन दोन महीने झाले तरी अद्याप शैक्षणिक साहित्यांचे वाटप झाले नाही....**

महोदय,

मिरा-भाईंदर मनपा शाळेच्या विद्यार्थ्यांना शाळा सुरु होऊन सुमारे दोन महीने झाले पण त्यांना आजतागायत शैक्षणिक सहित्यांचे वाटप झाले नाही. सुमारे १०,००० विद्यार्थी यात मराठी, हिंदी, गुजराती, उर्दु माध्यमांच्या शाळांमध्ये विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विद्यार्थ्यांना मनपा तर्फे पाठ्यपुस्तके, वहया, गणवेश, दप्तर, बुट, मोजे, पाण्याची बाटली. इत्यादि. शैक्षणिक साहित्य दिले जाते पण या वर्षी शाळेच्या विद्यार्थ्यांना अध्याप दिले नसल्याने दोन महिन्यापासुन त्यांना अभ्यास करता आला नाही. शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवणार कसे ? विद्यार्थी शाळेत येणार तर कश्यामुळे ? काय करणार येऊन ? अशा प्रश्न पालक, विद्यार्थी, शिक्षक, जनता करत आहेत. शासना तर्फे पाठ्यपुस्तके देण्यात आली पण वह्या अभावी अभ्यास कसा करणार ? इतर शाळां मध्ये विद्यार्थ्यांच्या Unit Test झाल्या आहेत. मागील वर्षी सुध्दा उशीरा शैक्षणिक साहित्यांचे वाटप झाले होते. तत्कालीन मा. महासभेत त्यावेळी मा. महापौर व प्रशासना तर्फे पुढील वर्षी म्हणजे यंदा शैक्षणिक साहित्य वेळेवर देण्यात येईल असे आश्वासन दिले होते. पण ते आश्वासन फोल ठरले. सदरचा प्रस्ताव मा. महासभेत घेऊन त्याची चौकशी करुन विलंब करणा-या कर्मचारी व अधिकारी यांच्यावर कार्यवाही करावी व शैक्षणिक साहित्यांचे वाटप लवकर करणे व पुढील वर्षी शाळा सुरु होणार त्याच दिवशी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्यांचे वाटप करणे करीता "ज" अन्वये प्रस्ताव मांडत आहे.

आपला विश्वासू

ध्रुवकिशोर पाटील

संपर्क कार्यालय : ३/अ, रोड व्यु, भाजी मार्केट, ६० फूट रोड, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०११०१.
: 98202 96597 / 2819 8989 E-mail : info@dhruvkishor.com Website : www.dhruvkishor.com

প্রাপ্তি. ৪/৫/৭৬
২০০.৯৩.৩৮
৪/৫/৭৬

# प्रशांत ज्ञानदेव दळवी

**नगरसेवक**

सदस्य : वृक्ष प्राधिकरण समिती

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

विशेष कार्यकारी अधिकारी (S.E.O.) - महाराष्ट्र शासन

सचिव/पुढे/ २५/१८७७, दि. ०५/०८/१६

मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय,

स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),

ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

**कार्यालय** : सी / १४-१०१, आदर्श को. ऑप. हौ. सो. लि., शांतीनगर, सेक्टर नं. ४, मिरारोड (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०७.

दूरध्वनी : २८१२८७७७ भ्रमणध्वनी : ९८६७७०८७७७ Email : prashantdalvi@gmail.com


जावक क्र. सेना २२३९/१६ दिनाक : ०५/०८/२०१६

**दि.१२-०८-२०१६ रोजीच्या मा. महासभेत "ज" खाली प्रस्ताव घेणेबाबत.**

**प्रकरण क्र. ५४**

प्रति,

मा. नगरसचिव सो.,

सचिव विभाग,

मिरा-भाईंदर महानगरपालका.

**विषय : मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मैदानांवर होणाऱ्या धार्मिक कार्यक्रमांना लावण्यात येणाऱ्या भाडयांमध्ये फेरबदल करणे बाबत.**

महोदय,

मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या भाडयाने देण्यात येत असलेल्या मालमत्तेचे भाडे हे अल्प असल्याने सदर मालमत्त्यांची देखभाल व दुरुस्ती करण्यास निधी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने सदर मालमत्तेचे भाडेवाढ प्रशासनाने प्रस्तावित करुन सदर प्रस्ताव दि. २३-०३-२०१५ रोजीच्या मा. महासभेपुढे ठेवला होता. मिरा-भाईंदर शहरातील मैदाने (आरक्षणे व आर.जी. जागा) हया पूर्वी प्रती दिन रू. १०००/- इतकी होती. त्यात सुधारणा करून प्रती रू. ३०००/- इतके भाडे आकारण्यास ठराव क्र. ८० अन्वये मंजूरी दिलेली आहे. व त्याबाबतची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे. परंतु सदरहू भाडे जास्त प्रमाणात आकारण्यात येत असल्यामुळे सर्वधर्मियांमध्ये असंतोष निर्माण झालेला आहे.

सबब सर्वधर्मियांची भावना लक्षात घेवून पूर्वी समत झालेल्या ठरावानुसारच फक्त धार्मिक कार्यक्रमांकरीता रू. १०००/- प्रती दिन भाडे आकारण्यात यावे व त्याची तातडीने अंमलबजावणी करणे करीता, चर्चेकरीता हा विषय मा. महासभेत घेण्यात यावा, ही नम्र विनंती.

आपला विश्वासु,

प्रशांत ज्ञानदेव दळवी

नगरसेवक

मिरा-भाईंदर महानगरपालिका

प्राप्त दि. ५/६/९६

वेळ - ११.३०

५/६/९६

# सौ. शर्मिला अ. गंडोळी (बगाजी)

**नगरसेविका**

**सदस्या-महिला बाल कल्याण समिती**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन**

सचिव/पुप्रो/३५/८/२०१८-१९, ५/८/१८

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय,
छत्रपति शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

**कार्यालय :** उत्तन भाटेबंदर, वेलंकनी रोड, भाईंदर (प), पो. उत्तन, ता. जि. ठाणे-४०१ १०६
मोबाईल : 8655786785 / 9167082302


जावक क्र. प्रकरण क्र. ५५ ... दिनांक : ५.८.२०१८

मा. महापौर साहेब,
मा. आयुक्त साहेब
✓ मा. नगर सचिव साहेब -
मि.भा.म.न.पा.

विषय - स्वातंत्र्य सेनानी - काका बॅप्टीस्टांचे उत्तन भूतबंगला भागात स्मारक उभारण्याबाबत - "ज" प्रस्ताव

महोदय,

आपल्या म.न.पा. हद्दीत उत्तन येथे बॅप्टीस्टा नावाचे कुटुंब असून त्या कुटुंबातील कर्तेपुरुष स्व. जोसेफ उर्फ काका बॅप्टीस्टा हे लोकमान्य टिळकांच्या काळातील स्वातंत्र्य योद्धे होते व ते लोकमान्यांचे कायदे सल्लागार होते, ते होमरूल चळवळीचे प्रणेते होते व पूर्वीच्या मुंबई महापालिकेचे महापौर होते.

त्यांनी गरीबांसाठी मोफत शिक्षणाची सुरुवात केली. आजही हे बॅप्टीस्टा घराणे उत्तन येथे कायम स्थायिक आहे.

सदर काका बॅप्टीस्टा हे भूतबंगला पॉईंट येथे मि.भा.म.न.च्या डी.पी. मध्ये दर्शविलेले आहे.

तरी सदर ठिकाणी थोर स्वातंत्र्य योद्ध्याचे स्मारक मंजूर करण्यासाठी मा. सभागृहास माझी विनंती आहे.

सदर विषय दि. १२.८.१८ च्या महासभेत "ज" प्रस्तावात घेण्यात यावा.

(सही)
शर्मिला अ. गंडोळी
स्थायी समिती सदस्या / नगरसेविका

प्राप्त दि. ५।८।१६

नोंद - ९२२०९८

०५।८।१६

सचिव/पु.क्र./९६।७, २०१६-१७ दि.०५/८/१६

**ध्रुवकिशोर पाटील**
मा. सभागृह नेता / नगरसेवक
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**सदस्य - दक्षता समिती शिधावाटप कार्यालय, भाईंदर**

जा.क्र/मनपा/०८/२२६/२०१६-१७ दि.०५/०८/२०१६

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन (१) (ज) अन्वये दि.१२/०८/२०१६ रोजीच्या मा. महासभेत प्रस्ताव घेणेबाबत**
**महासभा प्रकरण क्र. ५६**

**प्रति,**
**मा. नगरसचिव सो,**
सचिव विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय – परिवहन सेवेचा गलथान कारभारा बाबत.**

महोदय,

मिरा-भाईंदर मनपास सुमारे २०१४ साली जे.एन.एन.यु.आर.एम अंतर्गत ९० बसेस १०० टक्के अनुदान तत्वावर मंजूर झाल्या, अनुदान आले गाड्यांची चेसीस विविध कंपन्यांकडुन विकत घेतल्या त्यावर बॉडी बिल्ट करुन घेतली पण आजतागायत सुमारे दिड ते दोन वर्ष होत आली पण त्या बसेस चालविण्या करीता पालिकेने टेकेदार नेमला नाही. टप्या टप्यांने सुमारे ४२ बसेस पालिकेने मागविल्या आहे त्यातल्या ३० ते ३५ बसेस नागरीकांच्या सेवे करीता रस्त्या वर असतात उरलेल्या बसेस दुरुस्ती व टायर अभावी उभ्या असतात. वास्तविक या सर्व नवीन बसेस आहेत १०० टक्के बसेस रस्त्यावर नागरीकांच्या सेवे करीता पाहिजे. या आगोदर परिवहन ठेकेदारांना परिवहन विभागाने ९५ टक्के बसेस रस्त्यावर धावने बंधन कारक आहे असे करार नाम्यात अट टाकली होती. मग आता परिवहन विभाग एकूण बसेस पैकी ९५ टक्के बसेस नागरीकां करीता का उपलब्ध करीत नाही ? १ महिन्यापासून वोल्वो बसेस येऊन पावसाळ्यात उभ्या आहेत.

मागील आठवड्यात पावसामुळे पेट्रोल पंपात पाणी साचल्याने परिवहनच्या बसेसना डीजल न भेटल्याने फक्त ७ बसेस नागरिकांच्या सेवे करीता उपलब्ध होत्या. परिवहन सेवा ही आत्यावश्यक सेवा असल्याने परिवहन विभागातर्फे डीजल, टायर व दुरुस्ती करीता तात्काळ कार्यवाही करुन बसेस नागरीकांच्या सेवे करीता उपलब्ध करुन दिल्या पाहिजेत, परंतु तसे होत नाही. अजुन सुमारे ४८ बसेस विविध ठिकाणी उन्हात धुळ खात / पावसाळ्यात गंजून उभ्या असल्यांची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे लाखो रुपयांचे नुकसान जनतेचे व पालिकेचे होत आहे व हजारो नागरिक परिवहन सेवेपासून वंचीत आहेत. मा. महासभेत सदर विषय चर्चेला आणून ठेकेदार लवकरात लवकर नेमण्याकरीता **"ज" अन्वये प्रस्ताव मांडत** आहे.

आपला विश्वासू

ध्रुवकिशोर पाटील

**संपर्क कार्यालय - ६ पदमावती , नारायणनगर , भाईंदर (प.), ता.जि.ठाणे - ४०१ १०१.**
**Mobile : 98202 96597, Tel.: 2819 8989 E-mail : dhruvkishor.patil@gmail.com Website : dhruvkishor.com**

प्राप्त मि. ०५।१०।२०७६

वे० : १२:५५ बा

सचिव/पुढो/१७१८, २०१६-१७ दि. ५/८/१६

**धुवकिशोर पाटील**
**नगरसेवक**
मिरा-भाईंदर महानगरपालिका
सदस्य : मंडल रेलवे उपभोक्ता सलाहकार समिति, मुंबई - पश्चिम रेल्वे
सदस्य : दक्षता समीती शिधावाटप कार्यालय, भाईंदर.

जा.क्र/मनपा/०८/२२४/२०१६-१७ दि.०४/०८/२०१६

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन (१) (ज) अन्वये दि.१२/०८/२०१६ रोजीच्या मा. महासभेत प्रस्ताव घेणेबाबत**
**महासभा प्रकरण क्र. ५५**

प्रति,
**मा. नगरसचिव सो,**
सचिव विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय – सी.सी.टी.वी कॅमेरे शहरात बसवीणे बाबत.**

**महोदय,**

मिरा-भाईंदर शहराच्या लगत असलेले मुंबई, ठाणे महनगरपालिका व इतर मनपा मार्फत शहरातील सर्व प्रमुख रस्त्यांवर व चौकांवर सी.सी.टी.वी कॅमेरे रस्त्यावर होणा-या लुटींचे, चेन स्नॅचींग, चोरीचे प्रमाण व अन्य गुन्हे रोखण्याकरीता लावण्याचे ठरवीले आहे. आपल्या पालिके तर्फे सुध्दा सी.सी.टी.वी कॅमेर शहरातील प्रमुख रस्ते व नाक्यावर लावणे अत्यंत आवश्यक आहे. याकरीता मनपा कडे आर्थीक तरतुद नसल्यास नगरसेवाकांच्या प्रभाग निधी / नगरसेवक निधी मधुन लावणे बाबत मा. महासभेत सदर विषय चर्चेला आणून योग्य तो निर्णय घेण्याकरीता **"ज" अन्वये प्रस्ताव मांडत** आहे.

आपला विश्वासू

धुवकिशोर पाटील

संपर्क कार्यालय : ३/अ, रोड व्ह्यु, भाजी मार्केट, ६० फूट रोड, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०११०१.
☎ : 98202 96597 / 2819 8989 E-mail : info@dhruvkishor.com Website : www.dhruvkishor.com

प्राप्त मि. ०५।०८।२०७६

बेला - १२:५५ बा.

सचिव/प्रभो/९८/१८,२०१६-१७
दि.०५/०८/१६


**ध्रुवकिशोर पाटील**
**नगरसेवक**
मिरा-भाईंदर महानगरपालिका
सदस्य : मंडल रेलवे उपभोक्ता सलाहकार समिति, मुंबई - पश्चिम रेल्वे
सदस्य : दक्षता समीती शिधावाटप कार्यालय, भाईंदर.


जा.क्र/मनपा/०८/२२५/२०१६-१७ दि.०४/०८/२०१६

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनीयम १९४९ चे अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन (१) (ज) अन्वये**
**दि.१२/०८/२०१६ रोजीच्या मा. महासभेत प्रस्ताव घेणेबाबत**
**महासभा प्रकरण क्र. ५८.**

प्रति,
मा. नगरसचिव सो,
सचिव विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय – झाडांच्या फांद्याची छाटणी करणारी गाडी विकत घेणे बाबत.**

**महोदय,**

मुसळधार पाऊस, चक्री वादळ, सोसाट्याचा वारा या मुळे झाडे व झाड्यांचा फांद्या तुटण्याचे प्रकार मोठ्या प्रमाणात घडतात. झाडे व फांद्या घरांवर अथवा रस्त्यांवर व रस्त्यावर उभ्या असणा-या जाणा-या वाहनांवर पडुन वित्तहानी व जिवीतहानी होते सदर प्रकार टाळण्यासाठी वन विभागा मार्फत पावसाळ्या पूर्वी रस्त्या लगतच्या झाडांची पाहाणी करुन धोकादायक झाडांची व फांद्यांची छाटणी करण्यात येते तसेच पावसाळ्यात झाडांच्या फांद्याची छाटणी केल्यास झाडांची वाढ होते. या करीता वन विभागात झाडांच्या फांद्यांची छाटणी करण्याकरीता दोनच गाड्या मिरा-भाईंदर शहरात असल्यांने फांद्यांची छाटणी होत नाही मोठा अपघात होऊन जिवीतहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मिरा-भाईंदर शहराची भौगोलीक परिस्थिती व झाडांची संख्या पाहता दोन गाड्यांची आवश्यक्यता असल्याने मा. महासभेत सदर विषय चर्चेला आणून योग्य तो निर्णय घेण्याकरीता **"ज" अन्वये प्रस्ताव मांडत** आहे.

आपला विश्वासू

ध्रुवकिशोर पाटील


संपर्क कार्यालय : ३/अ, रोड व्यु, भाजी मार्केट, ६० फूट रोड, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०११०१.
: 98202 96597 / 2819 8989 E-mail : info@dhruvkishor.com Website : www.dhruvkishor.com

प्राप्त मि. ०५/०८/२०७६
बेला. १२:५५ बजे

**ध्रुवकिशोर पाटील**
**नगरसेवक**
मिरा-भाईंदर महानगरपालिका
सदस्य : मंडल रेलवे उपभोक्ता सलाहकार समिति, मुंबई - पश्चिम रेल्वे
सदस्य : दक्षता समीती शिधावाटप कार्यालय, भाईंदर.

सचिव/पुढे/१९/१०/१२८१५
दि. ६/८/१६

जा.क्र/मनपा/०८/२२८/२०१६-१७ दि.०६/०८/२०१६

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन (१) (ज) अन्वये दि.१२/०८/२०१६ रोजीच्या मा.महासभेत प्रस्ताव घेणेबाबत.**

प्रकरण क्र. ५१

**प्रति,**
**मा. नगरसचिव,**
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- ओला कचरा, सुका कचरा वेगवेगळ्या डब्यात ठेवणेकरिता गृहनिर्माण संस्थाना वेगवेगळे डब्बे देणेबाबत.**

महोदय,

उपरोक्त विषयान्वये आपल्या निर्दशनास आणू इच्छितो की, घनकचरा व्यवस्थापन नियम २०१६ मधील तरतुदीनुसार ओला कचरा व सुका कचरा असे वर्गीकरण करण्याकरिता महापालिका क्षेत्रातील गृहनिर्माण संस्थांना ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळा ठेवणेकरिता वेगवेगळे डब्बे देणे आवश्यक आहे.

याकरिता मनपा अंदाजपत्रकात तरतुद नसल्यास पुर्ननियोजन करण्यांत यावे किंवा नगरसेवक अथवा प्रभाग निधीतून देणेकरिता आवश्यक ती कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तरी सदर विषयावर मा. महासभेत चर्चा होणेकरिता **"ज" खाली प्रस्ताव** सादर करीत आहे.

आपला विश्वासू,

(ध्रुवकिशोर पाटील)
**नगरसेवक**

संपर्क कार्यालय : ३/अ, रोड व्ह्यु, भाजी मार्केट, ६० फूट रोड, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०११०१.
: 98202 96597 / 2819 8989 E-mail : info@dhruvkishor.com Website : www.dhruvkishor.com

प्राप्त दि. ५।७।१६

वेळ - ९.००

५।७।१६

सचिव/पुढे २०/११/१६-१७
दि. ६/८/१६

धृवकिशोर पाटील
नगरसेवक
मिरा-भाईंदर महानगरपालिका
सदस्य : मंडल रेलवे उपभोक्ता सलाहकार समिति, मुंबई - पश्चिम रेल्वे
सदस्य : दक्षता समीती शिधावाटप कार्यालय, भाईंदर.

जा.क्र/मनपा/०८/२२९/२०१६-१७ प्रकरण क्र. ६० करिता दि.०६/०८/२०१६

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची "ड" मधील प्रकरण दोन (१) (ज) अन्वये दि.१२/०८/२०१६ रोजीच्या मा.महासभेत प्रस्ताव घेणेबाबत.**

प्रति,
मा. नगरसचिव,
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय :- मा.नगरसेवक/नगरसेविका यांच्या मानधनात वाढ करणेबाबत.**

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये आपल्या निर्दशनास आणू इच्छितो की, गेल्या अनेक वर्षापासून नगरसेवकांना मिळत असलेल्या तुटपुंज्या मानधनात वाढ झालेली नाही. मनपा कर्मचा-यांना ५ वा वेतन आयोग, ६ वा वेतन आयोग व आता ७ वा वेतन आयोग मिळणार यामध्ये त्यांच्या पगारात मोठी वाढ होणार आहे तसेच अनेक भत्ते मिळत आहेत.

विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात आमदार व मंत्र्याच्या मानधनात, पगार व भत्यांमध्ये दुप्पट तिप्पट वाढ झालेली आहे, त्यांच्या स्विय सहाय्यकाच्या मानधनात व वेतनातही वाढ झालेली आहे तसेच लोकसभेच्या मागील अधिवेशनात खासदारांना मिळणा-या वेतनात व मानधनात घसघशीत वाढ झालेली आहे.

वाढलेली महागाई विचारात घेता, सबब सदर विषयांवर मा.महासभेत चर्चा करुन नगरसेवकांच्या मानधनात वाढ करणेबाबत **"ज" खाली प्रस्ताव** मांडत आहे.


आमदारांची वेतनवाढ 'एकमताने' मंजूर
मंत्रियों का वेतन हुआ ₹2 लाख
अब सांसदों को चाहिए वेतन-भत्ते में बढ़ोतरी
मंत्रियों-विधायकों ने डबल किया अपना वेतन

आपला विश्वासू,

(धृवकिशोर पाटील)
नगरसेवक

संपर्क कार्यालय : ३/अ, रोड व्ह्यु, भाजी मार्केट, ६० फूट रोड, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०११०१.
☎ : 98202 96597 / 2819 8989 E-mail : info@dhruvkishor.com Website : www.dhruvkishor.com

प्राप्त दि. ६/८/१६

वेळ- १.०० वा.

६/८/१६

# दिनेश तेजराज जैन
**सदस्य : वृक्ष प्राधिकरण समिती**
**नगरसेवक**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**विशेष कार्यकारी अधिकारी (S.E.O.) - महाराष्ट्र शासन**

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय,
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

कार्यालय : सेक्टर नं.३, बिल्डींग नं. अे /४५, दुकान नं. १४, शांतीनगर, मिरा रोड (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०७.
मो. : 9821246550 Email : jaindinesh536@gmail.com

जावक क्र. ________________ दिनांक : 8-8-2016

दि. 12 / 8 /२०१६ रोजीच्या महासभेत "ज" खाली प्रस्ताव घेणेबाबत.

प्रकरण क्र. 69

प्रति,
मा. नगरसचिव,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- महाराष्ट्र शासन निर्णय दि.२७ सप्टेंबर २००८ नुसार दरवर्षी जैन धर्मियांचे पर्युषण पर्वानिमित्त कत्तलखाने व मांस, मटणाची दुकाने बंद ठेवणेबाबत.

महोदय,

मिरा भाईंदर शहरातील सर्व जाती समाजाचे लोक एकत्र राहत आहेत. शहरात इतर समाजासोबत जैन समाजातील बांधव देखील मोठ्या संख्येने वास्तव्य करीत असून थोड्याच दिवसात जैन समाजाचे पर्युषण पर्व सुरु होणार आहे. या पवित्र पर्युषण पर्व कालावधीमध्ये शहरात कत्तलखाने व मांस मटण विक्रीची दुकाने बंद असावीत असा निर्णय महाराष्ट्र शासनद्वारा दि.२७/०९/२००८ नुसार घेण्यात आलेला आहे. पर्युषण पर्व कालावधीमध्ये जैन बांधवांच्या भावनेच्या आदरार्थ मिरा भाईंदर शहरात कत्तलखाने व मांस मटण विक्रिची दुकाने बंद ठेवणेबाबत शासनाच्या निर्णयानूसार कडक अंमलबलावणी करणेबाबत मी "ज" खाली प्रस्ताव मांडत आहे.

आपला विश्वासू,

(दिनेश जैन)
नगरसेवक
मिरा भाईंदर महानगरपालिका

पत्र प्राप्त दि- ८/8/2016

दु: 1:30 बजे

# डॉ. नयना मनोज वसाणी

**नगरसेविका**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**मुख्य कार्यालय,**

**स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),**

**ता. जि. ठाणे - ४०१ १०१.**

संपर्क : तन्वी क्लिनिक, फ्लॅट-००४, बिल्डींग बी-२४, अष्टविनायक, सेक्टर-७, शांति नगर, मिरारोड (पू), ता. जि. ठाणे-४०१ १०७.
दूरध्वनी : २८१२०१०१ / २८१००१०१. मोबाईल : 9833199995 Email : nayana.vasani@yahoo.com.

जावक क्र. ____________ दिनांक : ०८/०८/२०१६

दि. १२/०८/२०१६ रोजीच्या महासभेत "ज" खाली प्रस्ताव घेणेबाबत.

प्रकरण क्र. ६२...

प्रति,
मा. नगरसचिव,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- महाराष्ट्र शासन निर्णय दि.२७ सप्टेंबर २००८ नुसार दरवर्षी जैन धर्मियांचे पर्युषण पर्वानिमित्त कत्तलखाने व मांस, मटणाची दुकाने बंद ठेवणेबाबत.

महोदय,

मिरा भाईंदर शहरातील सर्व जाती समाजाचे लोक एकत्र राहत आहेत. शहरात इतर समाजासोबत जैन समाजातील बांधव देखील मोठ्या संख्येने वास्तव्य करीत असून थोड्याच दिवसात जैन समाजाचे पर्युषण पर्व सुरु होणार आहे. या पवित्र पर्युषण पर्व कालावधीमध्ये शहरात कत्तलखाने व मांस मटण विक्रीची दुकाने बंद असावीत असा निर्णय महाराष्ट्र शासनद्वारा दि.२७/०९/२००८ नुसार घेण्यात आलेला आहे. पर्युषण पर्व कालावधीमध्ये जैन बांधवांच्या भावनेच्या आदरार्थ मिरा भाईंदर शहरात कत्तलखाने व मांस मटण विक्रिची दुकाने बंद ठेवणेबाबत शासनाच्या निर्णयानूसार कडक अंमलबलावणी करणेबाबत मी "ज" खाली प्रस्ताव मांडत आहे.

आपली विश्वासू,

Vasani

(डॉ. नयना मनोज वसाणी)
नगरसेविका
मिरा भाईंदर महानगरपालिका

पत्र प्राप्त दि. 8/8/2016

[illegible]

# दिनेश तेजराज जैन
**सदस्य : वृक्ष प्राधिकरण समिती**
नगरसेवक
मिरा भाईंदर महानगरपालिका
विशेष कार्यकारी अधिकारी (S.E.O.) - महाराष्ट्र शासन

मिरा भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय,
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),
ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

कार्यालय : सेक्टर नं.३, बिल्डींग नं. अे /४५, दुकान नं. १४, शांतीनगर, मिरा रोड (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०७.
मो. : 9821246550 Email : jaindinesh536@gmail.com


जावक क्र. ____________ दिनांक : 8-8-2016

दि.१२/८/२०१६ रोजीच्या महासभेत "ज" खाली प्रस्ताव घेणेबाबत.

प्रकरण क्र. ६३.......

प्रति,
मा. नगरसचिव,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- वेदरशेडकरीता भाडे आकारणीबाबत मंजुर झालेल्या ठरावात सुधारणा करणेबाबत.

महोदय,

मिरा भाईंदर महापालिकेच्या मा. महासभा दि.१६/०१/२००९ प्रकरण क्र.९०, ठराव क.८३ अन्वये शहरातील इमारतीमधील दुकानासमोर/हॉटेल समोरील मोकळ्या जागेवर वेदरशेड उभारण्याकरीता संबंधीतांना भाडे आकारणीबाबत ठराव मंजुर झाला असून सदर ठरावातील परिच्छेद क्र.३ मध्ये उल्लेख केल्यानुसार महानगरपालिका क्षेत्राचा विचार न करता सरसकट रु.२५००/- आकारणी करत असली तरी सदर आकारणी ही प्रथम १०.०० चौ.मी. क्षेत्रासाठी ठेवून रु.३००/- प्रति चौ.मी. क्षेत्राच्या वर महानगरपालिकेच्या आर्थिक फायदा व्हावा म्हणून ५०.०० मी क्षेत्रापर्यंत रु.३००/- प्रति चौ.मी व ५०.०० चौ.मी. क्षेत्राच्या वर रु.४००/- प्रति चौ. मी **प्रति माह** असे सुधारीत दर लावणे योग्य राहील असे नमुद केले असून त्यामध्ये **प्रति माह** ऐवजी **प्रति वर्ष** सुधारणा करणेबाबत मी "ज" खाली प्रस्ताव मांडत आहे.

(दिनेश जैन)
नगरसेवक
मिरा भाईंदर महानगरपालिका

# सौ. निलम हरिश्चंद्र ढवण
**नगरसेविका**
**गटनेता-शिवसेना**
मिरा भाईंदर महानगरपालिका
**विशेष कार्यकारी अधिकारी - महाराष्ट्र शासन**


सचिव/कु.धो./ह/७६-९८ दि. ०७/०५/१८


**मिरा भाईंदर महानगरपालिका**
**मुख्य कार्यालय,**
**स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.),**
**ता. जि. ठाणे - ४०१ १०१.**

**निवास : बी/१०३, सरस्वती सदन नं. ३, सरस्वती नगर, नवघर रोड, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५.**
**कार्यालय : शॉप नं. ३, साईगिरी सोसायटी, साईबाबा मंदिराजवळ, साईबाबा नगर, नवघर रोड, भाईंदर (पूर्व), ता. जि. ठाणे - ४०१ १०५.**
**मोबाईल : ९८६९२६५६२२ / ८६५५८८०५२५**


जावक क्र.

दिनांक : ८.५.१८

मिरा-भाईंदर महानगरपालिका
मुख्य कार्यालय, (प.)
आ. क्र. ८०७
दाखल ता. ०७/०५/१८
आयुक्त
मि भा म न पा

प्रति,
मा. नगरसचिव सो.,
मिरा भाईंदर महानगरपालिका
भाईंदर (प.)

विषय :- "ज" प्रस्तावानुसार आरक्षण क्र. ११० येथे असलेल्या शीख धर्माचे धार्मिक स्थळ गुरूद्वाराचे ३७ अ नुसार आरक्षण बदलणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयानुसार आपणांस कळविण्यांत येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील भाईंदर पुर्व येथील शिख धर्माचे गुरूद्वारा हे एकमेव धार्मिक स्थळ आहे. सदर बांधकाम हे १९९० पुर्वीचे आहे. आपला विकास आराखडा हा १९९७ मध्ये तयार झालेला आहे. सदर विकास आराखडा तयार करताना येथील इमारतींचा विचार न करता व कुठल्याही प्रकारची शहानिशा न करता येथे आरक्षण टाकण्यात आलेले आहे. आता महापालिकेने विकास आराखडयाच्या आड येणाऱ्या प्रार्थना स्थळांना नोटीशी देऊन तोडण्याची कारवाई सुरू केलेली आहे. सदर गुरूद्वाराला ही नोटीस बजावण्यात आलेली आहे. त्यामुळे शीख धर्मियांच्या भावना दुखावल्या आहेत व लोकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झालेले आहे. तरी लोकांच्या भावनांचा विचार करता सदर आरक्षण रद्द करून गुरूद्वारा नियमित करणेत यावे सदर "ज" प्रस्ताव येणाऱ्या महासभेत घेण्यात यावा हि विनंती.

Dhawan
(निलम हरिश्चंद्र ढवण)
सभापती
प्रभाग समिती क्र.०३
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्राप्त दि. ११/०७/२०१६
वेळ - 03:45 वा.

सचिव/पु.क्षो./ ८/१६-१७
दि. ०७/०५/१६

# प्रमोद जयराम सामंत

मा. विरोधी पक्ष नेता

मिरा भाईंदर महानगरपालिका

०४/०५/२०१६.

मिरा-भाईंदर महानगर पालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
आ. क्र. 330
दाखल ता. 4/5/16
आयुक्त
मि.भा.म.न.पा

प्रति,
मा. नगरसचिव सो.,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- मा. महासभा दि. ०७/०५/२०१६ अनुसुची - 'ड' प्रकरण नियम 'ज' अन्वये प्रस्ताव सादर.

---

**नागरीकांच्या समस्या, अडचणी व त्याचे निराकरण करणेकरीता महापालिका आयुक्तांनी दि. ०१/०४/२०१६ पासुन कार्यालयात तक्रारी व शासकीय कामे घेऊन अधिका-यांना भेटण्यासाठी येणा-या अभ्यंगतासाठी ठरविण्यात आलेली वेळ पुर्ववत करणेबाबत.**

संदर्भ :- १. शासन परिपत्रक क्र. संकिर्ण/२०१५/प्र.क्र.१९३/नवि-२० दि. ०३.०७.२०१५
२. शासन परिपत्रक क्र. संकिर्ण/२०१६/प्र.क्र.९/१८(र.व.क.) दि. ०३.०७.२०१५
३. सामान्य प्रशासन विभाग जा. मनपा/सा.प्र./२०२४/२०१६ दि. २६.०२.२०१६

**महोदय,**

वरील विषयास अनुसरुन आम्ही खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत. मिरा भाईंदर महानगरपालिका परिसरातील नागरीकांच्या समस्या, अडचणी व त्याचे निराकरण करणेकरीता प्रभावी उपाययोजना करणेकरीता महापालिका आयुक्तांनी पूर्वनियोजीत भेटी व्यतिरिक्त, आठवड्यातील किमान २ तास (निर्धारीत वेळेत) तरी अभ्यांगतांकरीता द्यावेत या अनुषंगाने संदर्भ क्र. १ व २ प्रमाणे शासनाने आदेश दिलेले असून सदरचे आदेश मंत्रालयातील अधिकारी वर्गासाठी आहेत.

मा. आयुक्तांनी व प्रशासकीय अधिका-यांनी जन-सामान्यांची गा-हाणे ऐकण्यासाठी व सोडविण्यासाठी जास्तीत जास्त वेळ उपलब्ध असणे आवश्यक आहे. मिरा भाईंदरमधील १९ गावांतून अनेक गरीब नागरीक आपल्या कार्यालयात येत असतात. अनेक अधिकारी इतर बैठका व साईट व्हीजीटच्या कारणास्तव अनेक दिवस कार्यालयात अभ्यांगतांना भेटत नाहीत. यांच्या अनेक तक्रारी शासन दरबारी नोंद आहेत. याकरीता शासनाने संदर्भीय परिपत्रके काढलेली आहेत.

मंत्रालयातील अधिकारी वर्गासाठी शासनाने प्रसिध्दी केलेल्या परिपत्रकांचा चुकीचा अर्थ काढून त्यात नमूद केलेल्या **किमान** कालावधीचा, **कमाल** कालावधी असा सोयीस्कर अर्थ काढून आपण जन-सामान्यांना भेटण्याचे टाळल्यास सामान्य जनतेस त्यांच्या अधिकारापासून वंचित रहावे लागेल व त्यामुळे जनमानसात महापालिकेची पर्यायाने शासनाचीही प्रतिमा मलीन होत आहे. यावर मा. आयुक्तांनी फेर विचार करुन नागरीकांना भेटणेकरीता महापालिका विभागातील अधिका-यांनी जास्तीत जास्त वेळ देणे गरजेचे आहे. नागरीकांच्या समस्येचे महापालिका विविध विभागीय अधिक-यांकडून निराकरण न झाल्यास पुढील कार्यवाहीकरीता आयुक्तांनी नागरीकांना भेटण्याकरीता दिवस ठरवावा व इतर विभागीय अधिका-यांनी येणा-या अभ्यांगतांना भेटण्यासाठी कमाल वेळ राखून ठेवण्याकरीता चर्चा करुन योग्य निर्णय घेणेबाबत प्रस्ताव सादर.

सुचक - श्री. प्रमोद सामंत

अनुमोदक - ----------------------------

मुख्य कार्यालय : मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.
कार्यालय : शॉप नं. १३, बिल्डींग नं. बी-१०, शांतीनगर फेस - ९, मिरा रोड (पूर्व), जि. ठाणे - ४०१ १०७.
दुरध्वनी : २८०४५२५५ भ्रमणध्वनी : ९८२१ ०६३ १६२ E-mail : samantpramod@yahoo.co.in

सचिव/पुधो./५/८/१६-१७
दि. ०७/०५/१६


# प्रमोद जयराम सामंत

मा. विरोधी पक्ष नेता

मिरा भाईंदर महानगरपालिका


मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यालय
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
क्र. ३२८
दाखल ता. ४/५/१६

०४/०५/२०१६.

आयुक्त
मि.भा.म.न.पा.

प्रति,

मा. नगरसचिव सो.,

मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- मा. महासभा दि. ०७/०५/२०१६ अनुसुची - 'ड' प्रकरण नियम 'ज' अन्वये प्रस्ताव सादर.

---

**माहे ऑक्टोबर-२०१५ मध्ये महापालिकेमार्फत नव्याने बनविण्यात आलेले रस्ते खोदल्याने नागरीकांना झालेला त्रास व असुविधेबाबत जबाबदारी निश्चित करणेबाबत..**

महोदय,

वरील विषयास अनुसरुन आम्ही खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत. मिरा रोड पुर्व महापालिकेतर्फे विविध रस्ते बनविण्यात येतात, सदर रस्त्यांपैकी माहे ऑक्टोबर २०१५ मध्ये सॅन्डस्टोन बिल्डींग ते स्वर्ण बिल्डींग (सेव्हन इलेव्हन शाळे जवळ), सिंफनी ते फायर स्टेशन, श्री शरणम् बिल्डींग ते समर्पण बिल्डींग (वासुदेव कॉम्पलेक्स), मेरी गोल्ड-२ ते गौरव सेसिडेन्सी (महापौर बंगलो समोरील रस्ता), मेरी गोल्ड-२ ते आरक्षण क्रमांक ३०० कडे जाणारा रस्ता बनविण्यात आले होते. सदरचे रस्ते सध्या खोदून ठेवण्यात आलेले आहेत. त्यापैकी काही रस्त्यांचे काम पुन्हा सुरु करण्यात आलेले आहे. अजूनपर्यंत कुठल्याही रस्त्यांचे काम पूर्ण झालेले नाही.

तरी माहे जानेवारी-२०१६ पासुन आतापर्यंत खोदलेल्या रस्त्यांमुळे त्या ठिकाणी बरचशे अपघात झाल्याची नोंद वेळोवेळी झालेली आहे. नागरीकांनी मा. आयुक्तांकडे केलेल्या तक्रारीची दखल अद्यापपर्यंत घेण्यात आलेली नाही. नवीन बनविलेले रस्ते खोदल्याने करदात्या नागरीकांच्या पैशांचा अपव्यय झालेला आहे. सदरचे रस्ते कशासाठी खोदण्यात आलेले आहेत, याचे उत्तर प्रशासनाकडे देण्यास टाळाटाळ करत आहे. रस्ते खोदावयाचे होते तर त्यावर खर्च का करण्यात आला? अशा विचारणा नागरीक आमच्याकडे करीत आहेत.

तरी नागरीकांना होणारी असुविधा, रस्ते नवीन बनविणेकरीता झालेला खर्च, करदाता नागरीकांची गैरसोय, दैनंदिन साफ-सफाई करीता होणारा अडथळा, रहदारीस होणारा त्रास, परिसराचे विद्रुपीकरण या सर्व बाबींसाठी कोण जबाबदार आहे? याब ाबत रस्ते पुन्हा नवीन बनविणेकरीता होणारा खर्च याची जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे, याकरीता चर्चा करुन निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सादर.

सुचक- श्री. प्रमोद सामंत

अनुमोदक - श्री. जूबेर इनामदार


मुख्य कार्यालय : मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

**कार्यालय :** शॉप नं. १३, बिल्डींग नं. बी-१०, शांतीनगर फेस - ९, मिरा रोड (पूर्व), जि. ठाणे - ४०१ १०७.

**दुरध्वनी :** २८०४५२५५ **भ्रमणध्वनी :** ९८२१ ०६३ १६२ E-mail : samantpramod@yahoo.co.in

सचिव /पु.घो/ ६/६ /९६.९८
दि- ०७/०५/१६


**प्रमोद जयराम सामंत**

मा. विरोधी पक्ष नेता

मिरा भाईंदर महानगरपालिका


मिरा भाईंदर महानगर पालिका
मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
३००
दाखल ता. ४/५/१६

०४/०५/२०१६.

प्रति,

मा. नगरसचिव सो.,

मिरा भाईंदर महानगरपालिका.

आयुक्त
मि भा म न पा

विषय :- मा. महासभा दि. ०७/०५/२०१६ अनुसुची - 'ड' प्रकरण नियम 'ज' अन्वये प्रस्ताव सादर.

---

**रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तुंना नाव देण्याबाबतच्या ठरावातील महापालिकेने दिलेल्या गोषवा-या व्यतिरिक्त समाविष्ट केलेली नावे ठरावातुन वगळणेबाबत..**

संदर्भ :- मा. विशेष महासभा दि. १५/१०/२०१५ प्रकरण क्र. १०८, ठराव क्र. ७८

**महोदय,**

वरील विषयास अनुसरुन आम्ही खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत. मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याकरीता सन्मा. नगरसेवक/नगरसेविका यांना पत्र देऊन प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार दि. १५/१०/२०१५ च्या मा. महासभेच्या सुचनेनुसार प्रशासनाने प्रकरण क्र. १०८ करीता रस्ते, चौक, उद्याने व इतर वास्तुंना नावे देण्याबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणेकरीता ५८ ठिकाणे व आणि त्यांची नावे प्रस्तावित नावांचा गोषवारा देण्यात आलेला होता. प्रस्तावित नावांच्या गोषवा-याप्रमाणे मा. महासभेत चर्चा झाली असता, गोषवा-या व्यतिरिक्त इतर सुचना समाविष्ट करणेकरीता महापौरांना सुचना करण्यात आली.

परंतु असे असताना नव्याने महापौरांनी स्वतःच्या अधिकारात ५८ नावांचा गोषवारा दिलेला असताना त्याऐवजी १०१ ठिकाणांच्या नामकरणांचा ठराव बनविला. तसेच प्रशासनाने दिलेल्या गोषवा-यातील नावांमध्ये परस्पर बदल करुन नवीन नावे ठरावात अधिकाराचा गैरवापर करुन समाविष्ट करण्यात आली.

तरी अशा प्रकारे गोषवा-या व्यतिरिक्त ठरावात नमूद केलेली नावे रद्द करुन तसेच प्रशासनाने दिलेल्या गोषवा-यामध्ये बदल करण्यात आलेली नावे पुर्ववत करण्यात यावी याकरीता चर्चा करुन निर्णय घेणेसाठी प्रस्ताव सादर.

सुचक- श्री. प्रमोद सामंत

अनुमोदक - श्री. जूबेर इनामदार

---


**मुख्य कार्यालय :** मिरा भाईंदर महानगरपालिका, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपति शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे - ४०१ १०१.

**कार्यालय :** शॉप नं. १३, बिल्डींग नं. बी-१०, शांतीनगर फेस - ९, मिरा रोड (पूर्व), जि. ठाणे - ४०१ १०७.

**दुरध्वनी :** २८०४ ५२५५ **भ्रमणध्वनी :** ९८२१ ०६३ १६२ E-mail : samantpramod@yahoo.co.in